मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ९२ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ डिसेंबर २०१२

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)



## संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार,

२०१२ सालातील हा डिसेंबरचा हितगुजचा शेवटचा अंक प्रकाशित होत आहे. मार्चचा अंक हा २०१३ सालातील निघेल. सर्व मराठे परिवाराला नवीन वर्षांच्या शुभेच्छा या अंकातून देत आहे.

या अंकात 'हितगुज'च्या भवितव्याबाबत आपले म्हणणे काय आहे, वर्गणी वाढवून हितगुजचा अंक आपल्याला हवा आहे का या विषयीचे आपले मत जाणणे आवश्यक वाटल्याने दोन फॉर्मचे नमुने जोडले आहेत. टपालाने आपल्या घरी हे निवेदन येईलच पण तरीही 'हितगुज' च्या अंकात हे आवाहन मुद्दाम प्रकाशित करत आहे. ते वाचून त्यावर विचार करून योग्य ती कृती करावी अशी अपेक्षा मी व्यक्त करते.

मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह कै. श्री. भाऊसाहेब मराठे, कै. श्री. सुरेशभाऊ मराठे, श्री. वि. के. मराठे, श्री. वा. ग. मराठे इत्यादींच्या परिश्रमामुळे मराठे प्रतिष्ठानला मूर्त स्वरूप आले. मराठे प्रतिष्ठान 'परिवार समाचार पत्रिका' हे वहीच्या आकाराच्या आठ पानांचे हस्तलिखित १९८१मध्ये मुखपत्र म्हणून निघत असे.

मराठे प्रतिष्ठानचे पूर्वीपासूनचे कृतीशील ज्येष्ठ सदस्य श्री. विनायक केशव मराठे, वरळी यांनी 'हितगुज' हे समर्पक नाव दिले. भाऊसाहेब-मालतीबाईंच्या घरी त्याचे कसे बारसे केले आणि 'हितगुज'चे नामकरण केले. हे 'प्रतिष्ठानला पोरके करून गेल्या मालतीबाई' या लेखात सविस्तर सांगितले आहे. ते हितगुजच्या वाचकांना आठवत असेल, नोव्हेंबर १९८७ मध्ये 'हितगुज'चा दहावा अंक छापील स्वरूपात निघाला. चित्रकार राजा मराठे यांनी 'हितगुज'चा उत्कृष्ट लोगो तयार केला. त्यानंतर जून २००२मध्ये हितगुजचा सुवर्णमहोत्सवी अंक निघाला. त्यावेळी लक्ष्मणराव मराठे यांच्या संपादकीय कौशल्याने आणि परिश्रमाने हितगुजचे अंक नियमित, वेळेवर निघू लागले. हितगुजचा ७५वा अमृतमहोत्सवी अंक सप्टेंबर

### ✻ निमंत्रण ✻

मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा ३४वा वर्धापन दिन शनिवार दिनांक २६ जानेवारी २०१३ आयोजित केला आहे. त्यामध्ये पुण्यातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभही होणार आहे. या कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे कल्पक संस्थेद्वारा श्री. महेश पाटणकर आणि त्यांचे सहकारी यांचा **'शोध कवितेचा'** हा जुन्या मराठी कवितांचा त्याच लहानपणीच्या चालींमध्ये दृक-श्राव्य नाट्य असलेला सुंदर आविष्कार सादर करणार आहेत. तरी या कार्यक्रमाचा आपण आवश्य लाभ घ्यावा. सहकुटुंब, सहपरिवार व नातेवाईकांसमवेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही विनंती.

**: स्थळ :**

**वेदशास्त्रोत्तेजक सभागृह, स्पोर्टस ग्राऊंडसमोर,**
**विश्व-कल्पना हॉटेलजवळ, पेशवेपार्क चौक, पुणे ४११०३०**

**वेळ :** ४.३० ते ७.३०

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

Marathe Pratishthan

२००८मधे प्रकाशित झाला. प्रसिद्ध विख्यात साहित्यिक, नाटककार श्री. सुरेश खरे यांच्या शुभहस्ते हितगुजच्या ७५व्या अंकाचे लक्ष्मीकेशव हॉल, ठाणे येथे मोठ्या दिमाखात, थाटामाटात प्रकाशन झाले. सुरेश खरे आणि मान्यवरांनी अंकाचे यथार्थ मूल्यमापन केले.

२००४ सालापासून मी संपादिका म्हणून 'हितगुज'चे उत्तरदायित्व स्वीकारले. सहसंपादक सी. गो. खांबेटे यांनीही सुरुवातीला सहाय्य केले. परंतु हितगुजचा अमृतमहोत्सवी अंक स्वतंत्र प्रकाशित झाल्यानंतर मी सर्वच अंकाचे संपादन आजपर्यंत आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे करीत आहे.

**'हितगुज'चे ध्येय-धोरण**

'मराठे प्रतिष्ठान'चे मराठे, खांबेटे, विद्वांस, जाईल, फडणीस, रटाटे, जोशी इ. या कपि गोत्री परिवाराचे नियोजित कार्य कसे चालले आहे. त्यात उल्लेखनीय प्रगती किती झाली, भावी योजना काय, वैद्यकीय मदत, शिक्षणासाठी कर्ज, गुणवत्ता पारितोषिके, विविध उपक्रम या सर्व गोष्टींची माहिती सभासदांना करून देणे. त्यांच्या प्रतिक्रिया मागवणे हा 'हितगुज'चा मुख्य हेतू आहे. परस्परांच्या साहाय्याने सर्व कुलबांधव-कुलभगिनींचे हित साधणे, त्या अनुषंगाने सभासदांची ओळख करून देणे, पत्रव्यवहार करणे, सूचना करणे, कुलसंमेलने, मेळावे भरविणे, सांस्कृतिक कार्यक्रम करणे. आपुलकीचे, आत्मीयतेचे सबंध दृढकरणे, कुलबांधवांच्या कार्याचा गौरव करणे हे 'हितगुज' चे धोरण आहे. संपूर्ण परिवार हा 'हितगुज'मुळे जोडला जातो. दिवसेंदिवस 'हितगुज' असाच वर्धिष्णु. वर्धमान झाला तर मराठे परिवाराच्या प्रगतीची, वाढीची, विकासाची ती निशाणी ठरेल. तेव्हा 'हितगुज' प्रकाशित होतो ही चांगली चाललेली परंपरा आपण थांबवायची का?

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे** (पृ.१२०)
८/१३ सहकार नगर, वडाळा. मुंबई, ४०००३१, फोन ०२२-२४१५०८८९
२४, नोव्हेंबर.२०१२



श्रीमती रमाबाई रानडे यांनी स्थापिलेल्या पुणे सेवासदन सोसायटीला श्रीमती रमाबाईंचे पणतू श्री. रमाकांत विद्वांस यांनी त्यांच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल (रु. २,५०,०००) दोन लाख पन्नास हजाराची देणगी दिली.

त्याबद्दल उपकृत होऊन पुणे सेवासदन सोसायटीने मंगळवार दिनांक २ ऑक्टोबर २०१२ रोजी संपन्न झालेल्या राठी प्रशालेच्या वर्धापनदिनी श्री. रमाकांत यांचे वडील प्रा. कै. माधवराव उर्फ देवदत्त विद्वांस यांचे नाव शाळेच्या ग्रंथालयास दिले.



सर्व धर्म एकच असून ते माणसाला ईश्वरापर्यंत घेऊन जातात.

Marathe Pratishthan

प्रिय हितगुज सभासदांनो,

विषय : हितगुजची कठीण परिस्थिती

गेल्या तीन ते चार वर्षांत 'हितगुज'च्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या हलाखीच्या परिस्थितीकडे आपले आकर्षित करण्याचे आमचे प्रयत्न व हितगुजला सढळ हाताने मदत करण्याविषयीची आमची आव्हानं यांना आपल्यासारखा जाणकार व सजग सभासदांकडून मिळावा तेवढा प्रतिसाद मिळू शकला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

सुमारे वीस वर्षांपूर्वी सुमारे ११००/- सभासदांकडून रु.१००/- अशी तहहयात वर्गणी घेऊन जमवलेल्या रु. १,११,०००/- च्या हितगुज निधीवरील व्याज्याच्या रकमेतून तसेच वेळोवेळी मिळवलेल्या देणग्या व जाहिरातींच्या उत्पन्नातून हितगुजचा खर्च भागवला जात असे.

सध्या केवळ टपालखर्चच मिळणाऱ्या व्याजापेक्षा जास्त आहे आणि देणग्या व जाहिरातीतून मुद्रणखर्चाचा मेळ बसत नाही ही वस्तुस्थिती आहे. ही स्थिती अशीच राहिली तर पुढील तीन वर्षांतील हितगुजची स्थिती अशी राहील

| | रक्कम रु. लाख | | |
|---|---|---|---|
| | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ |
| वर्षारंभीचा हितगुज निधी | २.२६ | १.४४ | ०.५५ |
| अपेक्षित व्याज (९% दराने) | ०.२० | ०.१३ | ०.०५ |
| टपाल खर्च | ०.३५ | ०.३५ | ०.३५ |
| मुद्रण व छपाईखर्च | ०.६५ | ०.६५ | ०.६५ |
| वर्षाखेरीस हितगुजनिधीतील शिल्लक | १.४६ | ०.६० | -०.३५ |
| उत्पन्न व खर्च यामधील तफावत | ०.८० | ०.८७ | ०.९५ |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येत की उत्पन्न व खर्चातील तफावत 'हितगुज निधी'तून भरून काढल्यास २०१४च्या जून महिन्यापासूनच निधीअभावी हितगुज बंद करावा लागेल.

या वैयक्तिक पत्र लिहिण्यामागचा उद्देश 'हितगुज'च्या भविष्याबाबत आपले अमूल्य मत जाणून घेणे हा आहे. दिवसेंदिवस घटत चाललेले व्याजदर व वाढत जाणारा टपाल व मुद्रण खर्च याचा मेळ बसविण्यासाठी रु. १२ ते १५ लाख इतका 'हितगुज निधी' प्रतिष्ठानकडे असणे आवश्यक आहे. बहुतेक मध्यमवर्गीय बांधव सहकुटुंब सिनेमा बघण्यास वा उपहारागृहाकडे गेल्यास एवढा खर्च सहज करू शकतात किंवा करतात. त्यामुळे सध्याच्या बहुसंख्य सभासदांकडून किमान रु. २०००/-च्या एकरकमी देणगीची अपेक्षा अवास्तव नसावी असे वाटते. यामुळे प्रस्तावित निधीसंकलन सुकर होईल वा हितगुजसारखा स्तुत्य उपक्रम खंडीत होणे टळेल.

'हितगुज'च्या अस्तित्वासंबंधी हा निर्णय आपल्यासारख्या सुज्ञ वा जाणकार मंडळींच्या सहकार्याने व सार्वमताने व्हावा यासाठी हा पत्रप्रपंच.

आपला प्रतिसाद जाणून घेण्यासाठी सोबत दोन फॉर्म जोडले आहेत. आपला प्रतिसाद, या दोनपैकी योग्य तो फॉर्म संपूर्ण भरून प्रतिष्ठानच्या कार्यालयात दिनांक ३१ मार्चपर्यंत पोहोचेल अशा बेताने कळवावा. प्रतिसाद न आल्यास त्या सभासदास 'हितगुज' चालू ठेवण्यात स्वारस्य नाही असे समजून नाईलाजाने त्याचे सभासदत्व खंडीत करण्याचा अप्रिय निर्णय कार्यकारिणीस घ्यावा लागेल.

दिनांक ३१ मार्चपर्यंत आलेल्या प्रतिसादानुसार सन २०१३ मार्चपासून हितगुज बंद करायचे का रु. २०००/- वर्गणी देणाऱ्या सभासदांपुरते मर्यादित स्वरूप वितरित करायचे यासंबंधीचा निर्णय कार्यकारिणीमध्ये घेण्यात येईल. अर्थातच ज्या सभासदांकडून वरीलप्रमाणे देणगी प्राप्त होणार नाही त्यांना नाईलाजाने 'हितगुज'चे अंक मार्च २०१३ नंतर पाठवणे शक्य होणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी ही कळकळीची विनंती

या आवाहनास आपल्या अनुकूल प्रतिसादाची खात्री आहे. लोभ असाच वृद्धींगत व्हावा हीच अपेक्षा

आपले

कार्यकारी मंडळ, मराठे प्रतिष्ठान

## मानसन्मान

कु. मृण्मयी सचिन मराठे (पृ.१६) ही माध्यमिक शालांत शिष्यवृत्ती परीक्षेत रत्नागिरी शहर विभागाकडून ३००/२१६ गुण मिळवून गुणवत्तायादीत चोविसावी आली.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. मृण्मयीचे हार्दिक अभिनंदन.

Marathe Pratishthan

## फॉर्म १

प्रती : कार्यकारी मंडळ, मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग
प्रभादेवी, मुंबई ४०००२५

स.न.वि.वि.

मी .................................................................................. राहणार.......................................................
............................(संपूर्ण पत्ता)

आपणास कळवू इच्छितो की हितगुज यापुढेही सुरू राहावे ही माझी इच्छा आहे.

यापूर्वीच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून यापूर्वी मी रु. ................ची देणगी दिली आहे.तसेच या आवाहनास अनुलक्षून मी रु. .......... या रकमेचा ......................या बँकेचा धनादेश क्र. ........... सोबत पाठवित आहे. त्याचा स्वीकार करून या देणगीची पावती माझ्यावरील पत्त्यावर पाठवावी ही विनंती.

कळावे,

आपला/ली
(सभासद क्र. )

## फॉर्म २

प्रती : कार्यकारी मंडळ, मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग
प्रभादेवी, मुंबई ४०००२५

स.न.वि.वि.

मी ........................................................................................................ राहणार............................
............................(संपूर्ण पत्ता)

आपणास कळवू इच्छितो की यापूर्वीच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून यापूर्वी मी रु. ...............ची देणगी दिली आहे. त्यामुळे या आवाहनास प्रतिसाद म्हणून आणखी देणगी देण्यास माझी अनुकूलता नाही.

हितगुजचे सातत्य राखण्यास मला स्वारस्य नाही.

मार्च २०१३ नंतर हितगुजचे अंक मला न पाठविल्यास माझी हरकत नाही.

कळावे,

आपला/ली
(सभासद क्र. )

**: संपर्काकरिता फोन नंबर्स आणि ईमेल्स :**

१. **आनंदराव मराठे** : २५४२५५२४, anandaymarathe@rediff.mail २. **रमाकांत विद्वांस** : २४३०५२६०, rmvidwans@gmail.com ३. **श्रीनिवास मराठे** : २४४५८६२१, shriniwas_marathe@yahoo.com ४. **सीताराम खांबेटे** : २६८३६९९४, sitaram.khambete@gmail.com ५. **प्रभाकर मराठे** : २४१५०८८९, prabhakar_marathe@yahoo.com



Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 3

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

**'MY DAYS AT THE BHIRA NEW TUNNEL PROJECT"**

In the Year 1960, I started my professional carrier with Tata Power Co. Ltd. at their Bhira New Tunnel Project at Dongarwadi near Pune. Around the year 1924, Tatas had constructed Mulshi Dam to impound water of Mula River. From the water Intake Tower at Davdi, the water was transported through a six kilometer long tunnel to Dondarwadi and from there to the Hydro-electric Power Station at Bhira through a set of steep pressure pipes called Penstocks. The water conductor tunnel had not been provided with any masonry or concrete lining. Over the years, due to rock falls, water-carrying capacity of the tunnel went down so drastically that the Bhira Powerhouse faced an imminent closure. Since the power station was one of the main stations supplying power to Mumbai, there was no option but to continue with generation. Tatas therefore decided to construct a new concrete lined power tunnel by the side of the existing tunnel and make it a part of the water conductor system upon completion of its construction by connecting the tunnel to the existing system of penstocks so as to bring the power generation to full capacity. The project was named 'Bhira New Tunnel Project [BNTP].

Dongarwadi was a really god-forsaken place, though it was just about 60 kms. from Pune, At that time, reaching Dongarwadi from Pune was an ordeal. We had to avail three modes of transport. We used to travel from Pune to Mulshi by a Public Bus. From the bus stand we had to walk down to Mulshi Lake and board a launch. The launch used to drop us at Davadi from where we had to use our project jeeps to reach Dongarwadi. The other way was to travel to a place called Kolad near Roha on the Mumbai Goa Highway and then take Tata's private rail trolley to Bhira Power Station. The level difference between Bhira and Dongarwadi is about 600 m. i.e. about 2,000 ft. From Bhira we had to travel by Tata's Trolley pulled by a winches, in three stages, along a very steep haulage track. The ride used to be very thrilling but scary.

Dongarwadi is located at the edge of a cliff with a high mountain at the back. At night we could see the lights of ships sailing along the west coast. Our residential accommodation was in the form of nissen huts with a half round asbestos-sheet roof. Each officer was accommodated in a nissen hut with four rooms. During monsoon, we had to keep all doors and windows closed to prevent clouds from entering the rooms. My residence was considered as the best decorated one as I had placed curios all around and had good drapes for all the doors and windows.

During rainy season the whole area is in clouds. The rainfall at Dongarwadi is as much as 350 inches which is little less than that at Cherapunji. It doesn't rain, it pours. In monsoon, the weather was so humid that vegetables like potatoes and onions and cereals sprouted. Everything used to get covered with fungus. As a joke, we used to say that if you sleep for more than seven hours, your body gets covered with fungus. Power was free as we were a part of Bhira Power Station. Everyone family had three to four crude room heaters made of electric coils fixed on pieces of asbestos sheets. For drying clothes we had frames with galvanized sheet top and heaters underneath and we used to dry washed clothes by spreading then on the frame.

As a hobby, I had developed a small kitchen garden and I used grow cauliflowers, cabbages, knoll cols, tomatoes, gherkins etc. for my personal consumption. Jungle around was pretty thick with clusters of local black berries and local wild fruit.

Wild life was abundant. The jungle had animals like tigers, panthers, leopards, wild bores, deer, fox, and wild dogs. Those were the days when the jungles had sufficient prey for the wild cats. Human beings were attacked by the wild cats only in self defense or only when they were provoked. While returning from the site, we used to come across wild cats almost every evening. In summer, after the water holes in the jungle dried out, the only water source was an auxiliary reservoir at the end of our camp. After dusk, we could see wild life walking to the reservoir through our camp. When someone complained about wild life and reptiles, our boss would quip that it is not you but they who should complain, as we have encroached upon their privacy.

One late evening we were returning to our camp in an open jeep. While we were nearing the cusp of a deep valley, we found a leopard sitting right in the middle of the road. On seeing our jeep, the leopard started walking. Our driver tried to chase it and it started leaping in front of our jeep. It was a site to see. On one side of the road was a deep cutting and on the other side a deep valley and the leopard had nowhere to go except following the road and look for an escape route. We did not dare to provoke it further as it would have turned around and attacked us.

Our Tunnel was being constructed by a Jain organization. Their mess cook

Marathe Pratishthan

was also a Jain. One night, a leopard on its prowl was chasing a dog. The poor dog tried to take refuge in the mess. The cook shooed him away and closed the door. In front of him, the leopard lifted the dog. The cook was shocked and almost went mad, blaming himself for the death of the dog.

One evening, while we were at our club, we heard screams from the skilled workers colony. The wife of a carpenter just peeped out of her kitchen window and saw a leopard perched on the adjacent compound wall. She started screaming for help. Our drivers brought a couple of jeeps and in the bright headlights of the jeeps the leopard coolly walked away. We had many such sightings.

I am an animal lover. Before I got married, I had reared a seven day old pup and named him Pintoo. I had prepared a cozy bed for Pintoo but at night he used to jump into my bed and sleep beside me with his head on my pillow. I had trained him to eat out of his food plate but he would never start eating till I cajoled him and fed him with a first few bites. One summer, I had to go out of our camp for a week. I left Pintoo with a watchman. I never saw Pintoo agai. Wwhile he was with the watch man on night duty at our office, he was lifted by a leopard. I have never kept a dog thereafter.

My wedding took place on Wednesday, 5th July 1961 at Pune. This was a week before the Panshet Dam burst. The rain was like cloud burst. It was as if god was pouring buckets of water on the roof. I was ready to leave for Pune on Friday 30th June. However, all routes out of Dongarwadi were non-operational. Mulshi Lake was stormy and launches could not ply. A bridge between Mulshi and Pune was submerged. Tata's trolley line between Bhira Power Station and Roha was submerged at three places. There were no signs of improvement in the situation. The only way to communicate with Pune was to connect with Ganesh Khind Receiving Station of Tatas through their carrier line and request the operator to contact my would-be in laws through a local P & T line and convey my inability to leave Dongarwadi. The situation continued throughout Sunday. At one stage they were even considering postponing our wedding. However, on Monday afternoon, the rains relented for a short while. The Power House boss who was a friend of my would-be father-in wanted to take no chances and therefore asked to walk down on the haulage track in pouring rain with the help of a gang of riggers as sending the haulage track trolley to take me down would mean a few hours delay. Power house boss has positioned linemen with portable hand sets at the locations where the trolley track was flooded. By dusk, I got a message that could cross over to Kolad as the track was clear. Mr. Kandaswami – my valet was with me and we could reach Kolad around 8 pm. Bus services were in total disarray as the roads were submerged at many locations. Around 9pm. we spotted a bus heading towards Mumbai. Kandaswami stood in the middle of the road and almost forced the bus to stop. The bus was full to the brim. However, after I explained to the conductor that if he did not help me, I would miss my wedding, he and all other passengers agreed to oblige and I reached Thane after midnight just in time to catch the last late night passenger train to Pune. I reached Pune just before the religious ceremonies were to start. I could see the relief in everyone's eyes after they saw me. I then realized how difficult it could be to get married. I left Dongarwadi by August 1962 to join The Hindustan Construction Co. Ltd., at its Koyna Project.

This was Dongarwadi fifty years ago. I got an occasion to renew my association with the Bhira Project in the year 1990 when Tatas decided to convert the existing Bhira Hydel Power Station into a Pumped Storage Hydel Power Station and as a Consultant, I was assigned to carry out detailed planning and cost estimation of the project.

Power potential of a hydel project is limited by the quantity of impounded water and the level difference between the water storage and the generating station. The generation capacity therefore gets affected in the years with lean rainfall. During the pre-independence days, peak power demand used to be in the evenings. After we got our independence fast paced development commenced. Because of industrialization the pattern of power demand also changed. Level of normal demand and peak demand kept on rising. Gap between the normal and the peak demand widened. Therefore, by late 50s many thermal power stations based on coal and fuel oils and later based on nuclear power came up. Thermal stations can not be switched on and off at will. Generation of high pressure steam that drives the thermal turbines needs a few hours. When such turbines are switched off, they have to be kept on spinning to allow gradual cooling to prevent them from cracking. As against this, hydro-turbines can be switched on and off at short notice just by switching on and switching off the high-pressure water jets that drive the turbines. In short, the thermal stations have to keep on generating power round the clock even during the periods when the demand for power is low. To make effective use of such spare power, concept of Pumped Storage Hydel scheme was introduced in India around the year 1975. India's first Pumped Storage Hydel Scheme came up at Kadamparai in Tamilnadu.

Pumped Storage Hydel Stations are operated only during the peak load period. They have two storage reservoirs – the upper reservoir at top of the mountains and the lower reservoir at the tail end of the power station. The turbines are designed to double as



Marathi Pratishthan

pumps and the generators to double as motors. During light load periods, the spare power that keeps on coming out of the thermal stations is used to pump water from the lower reservoir to the upper reservoir to replenish the storage. Thus the same water is used again and again to increase peak power generation.

By now Dongarwadi area is very much developed. The Highway from Pune to Roha via Tamhini Ghat passes through Dongarwadi. Many resorts have come up in the area and Dongarwadi and Tamhini are fast developing into Tourist Spots. Bhira Power Station is now connected to the Mumbai Goa Highway by an all weather road.

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी,
बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे,
मनमाला टँक रोड, माटुंगा (प.),
दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

## आमची आगळी वेगळी भाऊबीज-ओवाळणी फॅक्टरी

**- मोहन मराठे (पृ.३६५)**

दिवाळीसणामध्ये आमचे मुख्य आकर्षण असते भाऊबीज- सर्व बहिणींनी एकत्र जमून कार्यक्रम ठरवायचा - सर्व भावांनी तिथे एकत्र यायचे - ओवाळणी कार्यक्रम करायचा - भोजनाचा कार्यक्रम करायचा-पुढच्या वर्षीचे ठिकाणावर प्राथमिक चर्चा करायचा. ह्या ओवाळणी फॅक्टरीबद्दल मी थोडे सांगताना मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत कुतूहल निर्माण झाले. त्याला प्रतिसाद म्हणून हा प्रपंच.

ह्या कार्यक्रमाची सुरुवात सुमारे ४० वर्षांपूर्वी झाली. लग्नानंतर बहिणी मुंबई, बेळगाव, पुणे अशा अनेक ठिकाणी विखुरल्या गेल्या. आम्ही बार्शीचा भाऊ सोडता मुंबई, डोंबिवली असे जवळपास राहू लागलो. बहिणींनी पुढाकार घेऊन एकत्र भाऊबीज कार्यक्रम ठरवला. आलटूनपालटून दरवर्षी एका एका बहिणीकडे त्या कार्यक्रम ठरवू लागल्या. एकत्र स्वयंपाक व इतर खर्च, आर्थिक व्यवहार त्या आपापसात ठरवता आम्हाला हे गुपितच आहे. व त्यांच्या निर्णयाप्रमाणे आम्ही एकत्र जमू लागलो. सख्खे चुलत आमचे एकत्र कुटुंब असल्याने एकत्र कार्यक्रम सुरू झाला. आमच्या घरातील मुले व मुली ह्यांच्या ओवाळण्याचा कार्यक्रम ह्याबरोबरच उरकण्यात आला. भावांची भाऊबीज रोखीत पण बहिणींनी उलट आहेराची प्रथा सुरू केल्याने भावांना पाकिटे देऊन पिशव्या परत घेऊन यावे लागे. ह्या कार्यक्रमात एक अडचण असे ती म्हणजे आमच्या भावांच्या सौ. ह्या कार्यक्रमात सामील होत असल्याने त्यांना त्यांच्या भावांना ओवाळण्याचा कार्यक्रम गैरसोयीचा ठरू लागला. मग त्यांनी आमच्या कार्यक्रमाच्या जवळपास- पुढे मागे- बहुधा पुढे हा कार्यक्रम उरकावा लागे. मेहुण्यांनी खूप समजूतदारपणा दाखवला. पुढे पुढे हा कार्यक्रम आमच्या भाऊबीजेच्याच दिवशी होऊन आम्हाला सौंची उपस्थिती विसरावी लागली. भाऊबीज मुंबई, डोंबिवली, बेळगाव, पुणे ठिकाणी साजरी झाला.

आमचा कार्यक्रम मार्गक्रमण करीत असताना आमची पुढची पिढी मोठी होऊ लागली. मोठ्या भावाची मुलगी अंजली, संगीता मोठ्या बहिणीची मुलगी अलका ह्यांनी पुढाकार घेऊन त्यांची वेगळी चूल त्याच गावात मांडावयास सुरुवात केली. व आम्हाला आमच्या कार्यक्रमानंतर त्या त्यांच्या मुख्य पदार्थांचा भोजनोत्तर स्वीट्सचा समाचार घेण्यास बोलवू लागल्या.

वयोमानानुसार आमची पिढी थकली आहे. आता तुमच्या पिढीने आमचाही कार्यक्रम त्यांच्याबरोबर साजरा करण्याची व्यवस्था केली आहे. ह्या कार्यक्रमामध्ये विशेष आश्चर्याची आणि आनंदाची बाब म्हणजे दुसऱ्या पिढीला अडचण असल्याने तिसऱ्या पिढीतील मुलींनी तिन्ही पिढ्यांची एकत्र भाऊबीज करण्याचा विक्रम केला आहे.

भाऊबीज कार्यक्रम म्हणजे भावांनी एकत्र ओळीने पाटावर बसावयाचे. त्यांच्या बहिणींनी एकापाठोपाठ सर्व भावांना ओवाळायचे. सुरुवात कधी मोठ्या पिढीच्या भावांनी करावयाची तर कधी क्रम बदलून सर्वात छोट्या पिढीच्या भावंडांनी सुरुवात करावयाची. भाऊ गुणिले बहिणी हा गुणाकार आता ८०च्या पुढे गेला आहे. सख्खे चुलत भाऊ- त्यांच्या बहिणी - त्यांच्यामुळे मुले-मुली अशी अनेक घराणी आपल्या घरातील जवळच्या इतरांना सामील करून घेऊ लागली आहेत. आता घरची जागा ओवाळणी फॅक्टरीसाठी जेमतेम पुरू लागली आहे. जेवणाचा कार्यक्रम बाहेर हॉलमध्ये - इमारतीच्या तळमजल्यावरील जागेत करावा लागत आहे. आता हा एकत्र कार्यक्रम पहिल्या व आता दुसऱ्या पिढीलाही आर्थिक नव्हे तर शारीरिक दृष्टीने झेपेनासा झाला आहे; पण ह्या कार्यक्रमाचे आकर्षण हा कार्यक्रम थांबू देणार नाही अशी आशा आहे. मागचा (२०११) च्या दिवाळीत हा कार्यक्रम माझी भाची अर्चना हिच्या घरी विजयनगर कॉलनी (पुणे) त झाला त्याला तीन पिढ्यातील अठरा भाऊ व तेरा बहिणी उपस्थित होत्या. एकूण ८० ओवाळण्या झाल्या. चवथ्या पिढीतल्या एका बहिणीला ओवाळायला भाऊ नव्हता. जेवणाचा कार्यक्रम शेजारच्या ना. सी. फडके हॉलमध्ये साजरा झाला न् आलेल्या भावांची ओवाळणी न आलेल्या बहिणींना आदानप्रदान केली गेली.

सगळे भाऊ सगळ्या बहिणी ह्यांना एकत्र आणणारा असा हा आमचा भाऊबीज कार्यक्रम आगळावेगळा आहे.

**- श्री. मोहन स. मराठे (पृ.३६५)**, ५, रामभुवन,अहिंसा मार्ग, खार (प.) मुंबई ४०००६२ फोन : ९८१९९६४७६५

Marathe Pratishthan

# माझी आई- एक मुक्त विद्यापीठ

- महेश मराठे, पुणे

आपल्या भारती संस्कृती आणि परंपरेत, आईला अत्यंत आदराचं स्थान दिलं जातं. आपल्या संस्कृतीनुसार मातृ देवोभव, पितृ देवोभव, आचार्य देवो भव यामध्ये प्रथमस्थान आईला दिलं गेलंय. आपल्या सगळ्यांचा पहिला गुरू म्हणजे 'आई'. आपल्याला प्रथम या जगात आणणारी, या जगाची ओळख करून देणारी आईच असते.

'आई माझा गुरू आई कल्पतरू, सुखाचा सागरू आई माझी' असं म्हटलंय ते याच अर्थात. आपल्या मनात आईबद्दल एक नितांत श्रद्धा असते. मला वाटतं, एक सात्विक, शुद्ध, निखळ प्रेम जर कुठलं असेल, तर ते फक्त आईचं प्रेम. संगीतकार आणि कवी यशवंत देवांनी आपल्या एका गाण्यात लिहिलंय.

'सर्वाठायी देव धावेल कसा? देवाला कामे अनेक प्रेम देण्यासाठी, आई निर्मिली, आई हे देवाचे रूप.'

या विश्वनिर्मात्याला इतकी काम आहेत की तो एकाचवेळी आपल्या सगळ्यांच्या वाट्याला येणं कठीणच! म्हणून, आपलं प्रेम देवानी 'आई' या व्यक्तीत सामावून टाकलंय.

अध्यात्मात आपण असं म्हणतो किंवा ऐकता की देवाचं प्रेम संपादन करा, देवाला आपलंसं करा. तर हे देवाचं प्रेम आपल्याला दुसरीकडे कुठेही मिळणार नाही, ते मिळेल फक्त आईच्या प्रेमात. आपल्या मुलांचे अक्षम्य अपराध पोटात घालून त्यांच्यावर फक्त मायेचा वर्षाव करणारी आई, मुलांना दु:ख आणि संकटाच्या झळा लागू नयेत म्हणून त्यांच्या डोक्यावर सतत प्रेमाची सावली धरणारी आई अशी अनेकविध रूपं आपण बघतो, तेव्हा आपल्या मनाला पटतं की खरंय प्रेम देण्यासाठीच देवानी आईची निवड केली आणि आईला देवाचं रूप प्राप्त करून दिलं.

माझ्या आईविषयी दोन शब्द तुमच्यापुढे बोलताना खरंतर नक्की काय काय बोलू? हा पहिला प्रश्न. कारण मनामधे भरपूर शब्द, वाक्य, घटना, संदर्भ इ. चा कोलाहल माजलाय. या ठिकाणी माझ्यापेक्षा वयानी आणि अनुभवानी ज्येष्ठ, श्रेष्ठ, अनुभवी अशी मंडळी आहेत. तरीसुद्धा आईविषयी कौतुकाचे काही शब्द सांगण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

माझी आई सौ. मीना मोहन मराठे. अतिशय जिद्दी, प्रचंड चिकाटी आणि ध्येय असलेली अशी करारी. त्याचबरोबर सरळमार्गी, नीटनेटकी, काहीशा भिडस्त स्वभावाची पण मनाने अतिशय हळवी अशी. लहानपणापासून सगळ्या कामांची आवड आणि वाट्याला येईल ते प्रत्येक काम हौसेने, उमेदीने करणारी. आजही काम करायची धडाडी, उमेद तिची वाखाणण्याजोगी आहे.

माहेरची परिस्थिती तशी बेताचीच. त्यामुळे लहानपणापासून कष्ट, कष्ट आणि फक्त कष्टच. सगळ्या बहिणींमध्ये मोठी अर्थात त्यांची ताई म्हणून सगळी जबाबदारी जास्त आणि उत्तमरित्या पेलवणारी. परिस्थिती माणसाला सगळं शिकवते. त्यामुळे 'स्वाभिमान' हा उपजतच रक्तात भिनलेला. तुकारामांनी एका अभंगात म्हटल्याप्रमाणे 'नारळ वरूता कठीण परी अंतरी जीवन' असा माझ्या आईचाा सहवास. नारळाला जसा वरून छेद दिल्याशिवाय गोड खोबरं मिळत नाही. त्याप्रमाणे वरकरणी आई जरी कडक वाटली तरी आतून ती अगदी शहाळ्याच्या गोड खोबऱ्याप्रमाणे आहे. फक्त तिला जाणण्यासाठी तिच्या पोटात शिरायला हवं मगच तिच्या पोटच्या मायेचा अनुभव कळतो.

माझे आजोबा काही वर्ष मिल्ट्रीमध्ये होते. त्यामुळे त्यांच्या मिलिटरीच्या खाक्यात आई लहानाची मोठी झाली. त्यामुळे प्रचंड शिस्तीची. आपल्या वडिलांचा हा शिस्तीचा गुण आईमध्ये खूप आढळतो. खूप सोशिकता आईमधे आहे, पण विनाकारण कारण नसताना कुणी काही बोललं गेलं, कुणी अपमान केला तर तो मात्र तिला अजिबात सहन होत नाही. मानाने चटणी भाकरी खाईन पण अपमानाने श्रीखंडपुरी खाणार नाही या स्पष्ट मताची.

कुठलंही काम आपल्या अंगावर घेऊन ते काम लीलया पेलणारी आणि आपल्या जीवाच्या करारावर ते काम पूर्णत्वाला नेणारी - दुसऱ्यांना सकारात्मक दृष्टीकोन दाखवून पाठिंबा देणारी, प्रोत्साहित करणारी उत्तम मार्गदर्शिका, पण योग्य ठिकाणी स्पष्टवक्ती. स्पष्टवक्ती या अर्थी म्हणतोय की आपणहून आई कुणाच्या अध्यात मध्यात न जाणारी. आपलं काम बरं आणि आपण बरं या स्वभावाची. पण जर तिच्या भिडस्त स्वभावाचा एखाद्यानी गैरफायदा घेतला तर मात्र, हा सूर्य आणि हा जयद्रथ दाखवणारी रोखठोक व्यक्तिमत्त्वाची.

कितीही आणि कशाप्रकारचेही आपत्तीचे प्रसंग आले तरी न डगमगता खंबीरपणे तोंड देणारी मोठ्या मानसिक ताकदीची माझी आई. तिचे व्यक्तिमत्व म्हणजे एक प्रचंड ऊर्जेचं स्रोत आहे. आईच्याच भाषेत सांगायचं झालं तर 'कामावे तो सामावे' या आम्हाला दिलेल्या अशी दीर्घोद्योगी. रोजच्या साध्या घरकामात, स्वयंपाकात किंवा ऑफिसच्या कामात अत्यंत कार्यकुशल आणि हाती घेतलेल्या प्रत्येक कामात सातत्य ठेवून यश मिळवण्याची तिची धडाडी जबरदस्त आहे. प्रत्येक काम योग्य हा पद्धतीने आणि त्या क्रमानीच ते काम करणं हा तिच्यातला एक चांगला गुण.

एक छोटंसं उदाहरण द्यायचं झालं तर वाळत टाकलेल्या कपड्यांच्या जागाही तिच्या ठरलेल्या. त्यात चुकूनसुद्धा इकडचा कपडा इकडे वाळत टाकलेला आढळणार नाही. जरी लाईट गेले तरीसुद्धा अंधारात ज्याचा त्याला कपडा ज्या त्या जागीच मिळाला पाहिजे ही त्यामागची तिची चांगली भावना. इतका नीटनेटकेपणा, इतकी शिस्त तिने आम्हालाही लावली आहे. त्यामुळे पहिल्यांदा जेव्हा आई बाहेरगावी गेली होती, तेव्हा मी एका वहीच्या पानावर कपडे वाळत टाकलेलं चित्र काढून



Marathe Pratishthan

कुठला कुणाचा कपडा कुठे वाळत घालायचा हे त्या चित्रावर लिहून ठेवलं होतं. खरंतर आम्ही कोणत्याही जागी कपडे वाळत घातले असते तरी चालणार होतं. पण नाही! आई घरात नसली तरी तिने शिकवल्याप्रमाणे आपल्यालाही काम जसंच्या तसंच करता आलं पाहिजे ही शिकवण तिने आमच्यापर्यंत पोहोचवली होती. मला वाटतं, आईबद्दल आमच्या मनात आदरयुक्त भीती होती आणि आज या घडीलाही आहे. त्यामुळेच शिस्तीच वळण आम्हाला चांगल्या तऱ्हेनी मिळालं असं म्हणायला हरकत नाही. हे एक प्रतिनिधिक उदाहरण तुम्हाला सांगितलं. पण अशा पद्धतीने निगुतीने, नीटनेटकेपणाने आणि चोख काम करण्याची शिस्त आम्हाला आईपासूनच मिळाली.

जिथली वस्तू जिथे तिथे जागेवरच गेली पाहिजे हा तिचा शिरस्ता. त्यामुळे आज कितीही घाई, गडबड जरी असेल तरी वस्तू जागच्याजागीच आणि वेळेत ठेवून पुढचं काम करायला आम्ही मार्गस्थ होतो. एकदा हाताला चांगली सवय लागली की ती कायमची राहते ही आईची शिकवण वेळोवेळी प्रत्ययाला येते.

स्वयंपाकाच्या बाबतीतही अतिशय निगुतीने, काळजीपूर्वक, चविष्ट, रुचकर आणि मुख्य म्हणजे वेळेत असा आईचा प्रत्येक पदार्थ असतो. संसारासाठी हातभार म्हणून विविध तऱ्हेच्या पदार्थांच्या ऑर्डर्स घेऊन तिने त्या पूर्ण केल्या. तिच्याच भाषेत सांगायचं झालं तर हजारोंनी साध्या पोळ्या लाटून झाल्यात. उत्तम पाककलेचा वारसा आईला माहेराहून जरी मिळाला असला तरी या पाककलेच्या वारसात काकणभर एक मात्रा देवानी आईला जरा जास्तच दिली आहे असं माझं स्पष्ट मत आहे. आईच्या हाताला अतिशय सुरेख चव तर आहेच; पण यशही आहे. जे करेल ते चांगलंच आणि अतिशय छान नाव ठेवायला कुठेही जागा नाही.

उत्तम तऱ्हेनी काटकसरीने संसार करणारी, सुसंस्कारित, गृहकृत्यदक्ष अशी सुगृहीणी बाबांना मिळाली आणि तिच्यापोटी मला जन्म मिळाला हे मी माझं भाग्य समजतो.

आईला वाचनाची भयंकर आवड. नुसतं वाचन करून ती थांबत नाही तर त्या वाचनातील चांगल्या उताऱ्यांच्या लेखनाचा संग्रहसुद्धा तिने केला आहे. या ठिकाणी एक आनंदाची बातमी मला आवर्जून सांगावीशी वाटते की, या लेखन संग्रहचं एक पुस्तक छापायलं असा विचार आहे आणि लवकरच ते आम्ही प्रकाशित करणार आहोत. सध्या वर्क-इन-प्रोग्रेस सुरू आहे.

आई एस.एस.सीला असताना गायन हा तिचा स्पेशल विषय होता. हा गाण्याचा वारसाही आईला तिच्या वडिलांकडून मिळालाय. उत्तम तऱ्हेनी गाणं ऐकण्याची आणि गाणं म्हणण्याचीही तिला आवड आहे. दारापुढच्या रांगोळीवरून घरातल्या गृहिणीची परीक्षा होते असं पूर्वीपासून म्हटलं जातं. त्याप्रमाणे आईची दारापुढे काढलेल्या रांगोळीची रेघ आणि एकूणच कुठलीही रांगोळी आणि रांगोळीची रेघ केसाइतकी बारीक आहे की रांगोळी बघतच राहावी. आणि याचं भाषिक प्रशस्तीपत्रक आमच्या मंडळाच्या कार्यकारी विश्वस्त सौ. सोमण यांनी तिला केव्हाच दिलंय हेही खरं. शिवणकाम हा तिचा अत्यंत आवडीचा छंद. त्यातल्यात्यात जुन्यातून नवं करण्याची हातोटी तर प्रशंसनीय. सर्वप्रकारचं शिवणकाम तिला येत. घरात पांघरूणं आम्ही कधी बाहेरून विकत आणलेली मला आठवत नाहीयेत. आता बाकीच्या कामाच्या व्यापामुळे शिवणकाम थोडं कमीच झाल्यामुळे या पाच-सात वर्षांपासून नवीन पांघरूणं बाहेरून आणली गेली हा अपवाद. पण अजूनही जेव्हा जेव्हा कामाच्या व्यापातून तिला वेळ मिळतो तेव्हा ती शिवणकाम उत्साहाने करते.

मला आणि माझ्या मोठ्या भावाला, आम्हा दोघांनाही तिने चांगल्या सवयी, वळण लावलंच पण घरातल्या सगळ्या कामांची सवयही लावली. कुठलंही काम मला येत नाही असं होता कामा नही. आणि वेळप्रसंगी आपलं कुठेही अडता कामा नाही ही तिची शिकवण. आज ही शिकवण आम्हाला बाहेरच्या जगात वावरताना उपयोगी पडते. थोडक्यात, जगण्याचं अवघड गणित सोपं कसं करायचं हे दाखवणारी माझी आई. तिच्याकडून सकारात्मक, सकस, चांगलं आणि आशादायी असंच विचारधन आम्हाला मिळत राहिलंय. मला वाटतं आई ही एक 'मुक्त विद्यापीठ' आहे; जिथं देणगी द्यावी लागत नाही. परीक्षाही द्यावी लागत नाही. तरी प्रत्येकाचा आपापल्यापरीने पहिला नंबर येतो.

८ जून २०११ रोजी आईनी ६०व्या वर्षात पदार्पण केलंय. दिसायला ६० वर्षे जरी दिसली तरी मनाने, नव्या उमेदीने. ती अजूनही वयाच्या पंचविशीसारखीच कार्यरत आहे. रोज उगवणाऱ्या नवीन दिवसागणिक आई जास्तच उत्साही, तरतरीत नव्या उर्जेनी तिची नेहमीची ठरलेली आणि जास्तीची कुठलीही आणि कितीही काम करते. आता मी साठीची झालेय, माझं वय झालं असं कधीच तिच्या तोंडातीन निघत नाही. अखंड कामात राहणं हे मला वाटतं तिच्या मनाच्या चिरतरुणपणाच लक्षण आहे. आज २१व्या शतकात माणसाचं आयुर्मानही वाढलेलं आहे त्यामुळे वयाची साठी म्हणजे खऱ्या अर्थाने वयाची तिशी पस्तीशीच असं मी म्हणेन. याला अनुसरून असं म्हणाला हरकत नाही की आई म्हणजे रसरसता जीवनरसच.

एका कवितेच्या ओळी मला आठवतंयात त्या मी सांगते,

*करांगुळीने गोवर्धन पेलण्याची परंपरा,*
*आई तू सांभाळलीस,*
*संसाराचा डोंगर पेलताना,*
*जरा नाही दमलीस.*
*आई, समईतल्या ज्योतीला तरी*
*काजळी धरते*
*पण, तुझ्या तेवण्यातून आज*
*फक्त जीवनच फुलते.*

आईला चांगल्या आरोग्याचं शतायुषी आयुष्य मिळो आणि तिचा प्रत्येक दिवस हा आनंदाचा होवा ही सदिच्छा मी देवाजवळ मागतो.

शेवट जाता जाता एवढंच म्हणीन, 'आई' ही अक्षरे दोनच; पण त्यात विश्व सामावेल एवढी प्रचंड व्यापकता आहे. ती व्यापक जाणीव शब्दबद्ध करण्याचा हा छोटासा प्रयत्न, ज्यांनी माझ्याकडून करून घेतला त्या परमेश्वराचे शतशः आभार!

**- श्री. महेश मोहन मराठे,**
८९२/ब, राणी लक्ष्मी मंडळ, पहिला मजला,
नागनाथपाराजवळ, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०, मोबाईल : ९५५२३८४९०८

**ज्ञानसारखी पवित्र गोष्ट या जगात कुठलीही नाही**

Marathe Pratishthan

# जगांतले लघुत्तम पत्र आणि उत्तरही

**- ना.ज.जाईल (पृ.७५५)**

पत्र म्हणजे दोन व्यक्तींमधील संभाषण असते असे म्हणतात. मग त्याची लांबी किती असावी? असा प्रश्न विचारला तर उत्तर एकच असेल- कितीही

आणि ते कदाचित खरंही आहे, कारण संभाषणाचा कालावधी किती असावा यावर काहीही बंधन नसतं. कोण व्यक्ती किती वेळ बोलेल याचा अंदाज वर्तविता येणं हे हवामानाचा अंदाज वर्तविण्याएवढंच -किंबहुना त्यापेक्षाही अधिक कठीण आहे. अगदी दूरध्वनीवरील संभाषणाचा विचार केला तरी आपल्या लक्षात येईल की किरकोळ चौकशी करण्यापासून सुरू होणारे संभाषण अनेक प्रसंगी अकारण लांबत जातं. मी एकदा एक गृहस्थांकडे गेलो होतो त्यावेळी त्यांची पत्नी दूरध्वनीवर चक्क कुठल्या तरी पाकक्रियेची माहिती अत्यंत सविस्तरपणे सांगत होती. मला गंमत वाटली.

आणखी एक प्रसंग माझ्या चांगलाच लक्षात राहिला आहे. अलीकडेच घडलेला. मी पुण्याहून सकाळी डेक्कन क्वीनने मुंबईला निघालो होतो. गाडी सुटली आणि शिवाजीनगर स्टेशन पार करण्यापूर्वीच जवळ जवळ प्रत्येकाच्याच कानाला मोबाईल चिकटला. 'मोबाईल' हा सध्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक झाला आहे. मोबाईलशिवाय एखादी व्यक्ती दाखवणं सध्या तरी अशक्यप्राय गोष्ट आहे. पूर्वी एस. टी.संबंधी एक जाहिरात प्रसिद्ध होती. ती अशी होती,

गळकी एसटी दाखवा

हजार रुपये मिळवा

माझ्या एका मित्रानं त्याला पुस्ती जोडली होती - पावसाला सोडून. याच माझ्या मित्राने अलीकडे नवी जाहिरात तयार केली आहे. तो म्हणतो-

मोबाईलशिवाय व्यक्ती दाखवा

दहा हजार रुपये मिळवा.

इतक्या वर्षांत हजार रुपयांचे दहा हजार होणे स्वाभाविक आहे. कशी वाटली जाहिरात? त्यातला विनोदाचा भाग सोडला तरी हल्ली मोबाईलचं प्रमाण वाढलं आहे हे निश्चित. परवाच कुठेतरी वाचलं की मुंबईसारख्या शहरात लोकसंख्येपेक्षा मोबाईल संख्या अधिक आहे. विशेष म्हणजे बऱ्याच व्यक्तींकडे एकापेक्षा अधिक मोबाईल असतात. अशाच एका व्यक्तीला - तरुण मुलगा होता तो- मी विचारलं,

''क्यों भाभी, तुम्हारे पास मोबाईल-''

''मेरे पास तीन मोबाईल है''

माझं बोलणं पूर्ण होण्यापूर्वीच त्याने उत्तर दिलं, परंतु मी चिकाटीनं पुन्हा विचारलं,

''लेकिन एक टाईम तुम एकही मोबाईल इस्तमाल कर सकते हो, तो और दो किसलिये?''

त्याने माझ्याकडे पाहिलं आणि कदाचित माझ्या वयाचा अंदाज घेऊन मला उत्तर दिलं

''अंकल... अब जमाना बदल गया है. आपके टाईम की बात अलग थी. अभी ग्लोबलायझेशनका जमाना है''

ग्लोबलायझेशन आणि मोबाईल - म्हणजे एका व्यक्तीने एकाच वेळी दोन किंवा अधिक मोबाईल वापरणं- यांचा काय संबंध आहे हेच मला कळलं नाही. मी गप्प बसलो.

थोडं विषयांतर झालं खरं.. तर मी काय सांगत होतो... हं, डेक्कन क्वीनने पुणे स्टेशन सोडलं आणि पाच मिनिटातच जवळ जवळ सर्व प्रवाशांच्या कानांना मोबाईल चिकटले. खरं म्हणजे सकाळचं प्रसन्न वातावरण होतं. हवाही छान होती. बाहेरचा परिसर हिरवागार होता. पण कुणाचंही तिकडे लक्ष नव्हतं. प्रत्येकजण मोबाईलवरील संभाषणात मग्न होता. बहुधा मी एकमेव वेडा होतो की जो बाहेर निसर्गातली होणारी हिरवी उधळण पाहत होतो. माझ्यासमोर बसलेली तरुण मुलगी, असेल बावीस-तेवीस वर्षांची, तीही मोबाईलला चिकटली होती. दहा-पंधरा मिनिटं झाली तरी तिचं बोलणं चालूच होतं. लोणावळा येईपर्यंत ती बोलत होती. नंतर घाटात मात्र कुणीच मोबाईल वापरताना दिसलं नाही. मी काहीसा आश्चर्यचकित झालो; परंतु नंतर उलगडा झाला. बोगदे असल्यामुळे त्यांना 'क्लीअर रेंज' मिळत नव्हती. त्याचा अधिक खुलासा करून घेण्याच्या भानगडीत पडलो नाही. नशीब त्या मोबाईलचं. त्यानिमित्ताने का होईना परंतु त्यांना- मोबाईलना विश्रांती मिळाली. कर्जतला गाडी थांबल्यावर सर्व प्रवासी खाली उतरले. ते अनिवार्य असतं. एक वेळ इनकम टॅक्स चुकवतील परंतु ट्रेनने गेल्यास कर्जतला आणि कारने गेलं तर खोपोलीला (आता मुंबई-पुणे एक्सप्रेस वे झाल्यामुळे प्रवाशांना 'त्या' आनंदाला मुकावं लागतं) बटाटावडा टॅक्स चुकविणारा प्रवासी विरळच. वडे खाऊन मंडळी ताजीतवानी झाली. नंतर मोबाईलवरील बोलणं आणि गाडी एकाच वेळी सुरू झाली. माझं लक्ष समोरच्या मुलीकडे गेलं. तिनेही मोबाईल कानाला लावला होता. म्हणजे तिचं पत्र अजून पूर्ण झालं नव्हतं.

पलीकडच्या बाजूला एक प्रौढ माणूस बसला होता. त्याला मोबाईलवर बोलताना पाहिलं नव्हतं. बहुधा त्याच्याकडे मोबाईल नसावा असे मला वाटले. म्हणजे आपलाच भाईबंद असावा असा विचार मनात आला. त्याच्याशी दोन शब्द बोलावे असं वाटलं व मी आसनावरून उठणार होतो त्याच वेळी गाणं ऐकू आलं,

सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्तां हमारा..

तर माझा अंदाज पूर्णतय: चुकला होता. त्याच माणसाकडे मोबाईल होता आणि ते गाणे म्हणजे त्याच्या मोबाईलचा रिंगटोन होता. त्याने मोबाईल कानाला लावला.

''हॅलो,'' एकच शब्द बोलला आणि एक मिनिटाने म्हणाला, ''ओके''

आणि मोबाईल बंद करून त्याने खिशात ठेवला. म्हणजे त्याचं बोलणं संपलं होतं. पुण्याहून निघाल्यापासून एवढं कमी बोलणारी ही पहिलीच व्यक्ती होती. म्हणजे याचं बोलणं-पत्र लघुत्तम होतं. परंतु समोरच्या मुलीचं बोलणं - पत्र लेखन चालूच होतं.

पुन: थोड्या वेळापूर्वीचा विचार मनात आला... पत्राची लांबी किती असावी? सविस्तर लिहिण्यासाठी पाकिट... त्याला सीमा नाही. त्यापेक्षा कमी असेल तर... अंतर्देशीय म्हणजे

Marathi Pratishthan

पत्राच्या लांबीवर बंधन झालंच. आणि त्यापेक्षा की मजकूरासाठी - पोस्टकार्ड तरी त्यावर बराच मजकूर राहतो. त्या पार्श्वभूमीवर या मुलीचं पत्र म्हणजे पाकिट (खरं म्हणजे लघुत्तम... फक्त दोन शब्द ओके.)

डेक्कन क्वीन धावत होती. आजूबाजूची सर्वच मंडळी मोबाईलवर बोलत होती. त्यामुळे कुणाशी संवाद साधावा असा प्रश्न पडला. त्यातच घाटात बाहेरचा परिसर नयनमनोहर होता. त्यामुळे तो पाहण्यात वेळ गेला. परंतु कर्जतनंतर मात्र रखरखीतपणा फार जाणवला. बाहेर पाहण्यासारखं काहीच नव्हतं. स्वाभाविकच मी वर्तमानपत्र उलगडलं आणि वाचू लागलो. दुसरा पर्यायच नव्हता.

वर्तमानपत्रातील सर्व बातम्या मी वाचतोच असं नाही. परंतु चौकटीतल्या बातम्या मात्र न चुकता वाचतो. अशा प्रकारच्या बातम्या खुसखुशीत तर असतातच परंतु मोठ्या मनोरंजकही वाटतात. गेली कित्येक वर्षे मी त्यांचा मागोवा घेत आलो आहे. त्यापैकी काही बातम्या पुन: पुन: प्रसिद्ध होतात. त्यातले संदर्भ निराळे असतात. ठिकाणं वेगळी. म्हणजे फरक फक्त तपशीलात असतो. बातमीं मूळ सूत्र मात्र तेच असतं.

मध्यंतरी अशीच एक चौकटीतली बातमी वाचली. शीर्षक होतं - पोस्ट कार्डाचा प्रवास तब्बल ४८ वर्षे! बातमी अर्थातच मनोरंजक होती.

''केवळ १८ किलोमीटर अंतरावरील गावाच्या पत्त्यावर पाठविण्यात आलेल्या एका पोस्टकार्डास इच्छित स्थळी पोहोचण्यास तब्बल ४८ वर्षांचा कालावधी लागल्याचे नुकतेच पाहावयास मिळाले. ३ मार्च १९४८ रोजी जगन्नाथ राव या वकिलाने सौदागर अय्युब या आपल्या अशिलास रसूलकोंडा येथील पत्त्यावर हे कार्ड पाठविले होते. या गावाचे सध्याचे नाव भंजनगड असे आहे. हे पत्र गेल्या ७ ऑक्टोबर रोजी त्या पत्त्यावर पोहोचले. ४८वर्षांचा प्रवास पूर्ण करून आलेल्या कार्डाची त्या वेळची किंमत एक आणा (सध्याचे सहा पैसे) एवढी होती. व त्यावर पंचम जॉर्ज यांचे तिकिट होते. पत्र पाठविणारा वकील व त्याचा अशील हे दोघेही आता हयात नाहीत.''

ती बातमी ओरिसामधली होती. परंतु अशाच घटना इतरत्रही घडतात. या प्रकारची बातमी वर्षांतून दोन-चार वेळा तरी वाचायला मिळतेच. फरक फक्त तपशीलांत असतो. एखाद्या ठिकाणी २५ मैलांचं अंतर ३० वर्षांत पार केलं जातं तर दुसऱ्या घटनेत ५० मैलांचं अंतर पार करण्यासाठी ४० वर्षांपेक्षा अधिक काळ लागतो. मला तर वाटतं की अशाप्रकारची बातमी न वाचलेली व्यक्ती क्वचितच आढळेल.

पत्र या विषयाबद्दल मला नेहमीच कुतूहल वाटतं. अर्थात त्याच्या शास्त्रीय बाजूचा विचार मी कधी केला नाही. पत्राचा शोध कुणी लावला. ही पद्धत कुणी आणि केव्हा अंमलात आणली कंवा हिंदुस्थानतील टपाल व तार खात्याचा विकास... या किंवा अशा प्रकारच्या ऐतिहासिक बाबी रूक्ष वाटल्यामुळे त्यात मी कधीच रस घेतला नाही. परंतु टपाल, पत्र, तार, पोस्टमन... यांच्यासंबंधी वृत्तपत्रात येणाऱ्या गमतीदार बातम्यांनी मात्र माझं लक्ष नेहमीच वेधून घेतलं. विशेष म्हणजे या आणि अशा बातम्या नेहमीच चौकटीत येतात. सगळ्यात महत्त्वाची आणि गमतीची बाब म्हणजे अशा प्रकारच्या घटना जरी विशिष्ट काळात घडल्या असल्या तरी त्या बातम्यांची वाचकाला आनंद देण्याची क्षमता मात्र कालातीत असते. आणि अशी बातमी कितीही जुनी असली तरी तो जुनेपणा वाचकाला जराही जाणवत नाही. परिणामी या चौकटीतल्या बातम्या कधीच शिळ्या होत नाहीत.

या चौकटीत काय काय वाचायला मिळतं या प्रश्नाचं उत्तर एकच मिळेल - 'सगळं काही'. एका पोस्टमनने टपाल वाटायचा कंटाळा आला म्हणून अर्धी पत्रे गटारात टाकून दिली होती. आता पैसे पाठवायचे असल्यास त्याकरिता मनिऑर्डर करावी लागते हे कुणाला माहीत नाही? परंतु त्याबाबतींतही आपण मजेशीर हकिकती ऐकतो. एका महाभागाने आपल्या मित्राला पोस्टाच्या पाकिटांतून पैसे पाठविले. विशेष म्हणजे त्या शहाण्या (?) गृहस्थाने पाकिटावर केवळ मित्राचा पत्ताच लिहिला नाही तर बाजूला कंसांत लिहिले.... (पन्नास रुपये पाठविले आहेत. मोजून घ्यावे व पोच द्यावी.) आहे की नाही गंमत! आता हा माणूस कदाचित अशिक्षित असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. परंतु इंटर सायन्सची परीक्षा झाल्यावर गुणपत्रिका - मार्कशीट मिळविण्यासाठी आमच्या एक मित्राने त्यासाठी आवश्यक असणारे दोन रुपये पाकिटांतून पाठविल्याचे मला आढळले.

पूर्वी पत्र लिहिण्याचं काम घरातली वडील मंडळी करीत असत. पत्र पाठविण्यासाठी कारणंही ठरावीक. घरात झालेल्या जन्ममृत्यूची माहिती नातेवाईकांना आणि परिचितांना देणं हे महत्त्वाचं कारण. पत्र लिहायला सुरुवात करायची ती कागदाच्या वरच्या बाजूला. 'श्री' असं लिहून. पत्राच्या सुरुवातीला 'श्री' असं लिहिलेलं दिसलं नाही तर वाचणारा समजायचा की पत्रात काहीतरी वाईट, दु:खद बातमी असणार. पुष्कळवेळा वाचणाऱ्याला 'श्री' दिसली नाही तर तो बहुधा रडायला सुरुवात करायचा. आणि तार आली तर घरातले सगळेच रडायला लागायचे. मग त्या तारेत काय मजकूर आहे हे कुणी पाहत नसे.

पाकिटाचा वापर क्वचित केला जाई. सर्वसाधारणपणे लोक कार्डाचाच उपयोग करीत. अर्थात पत्र लिहिणं ही एक कला आहे आणि ते येरागबाळ्याचे काम नाही हे शाळेत गेल्यावर... वार्षिक परीक्षेत मराठीची प्रश्नपत्रिका वाचल्यावर कळलं. पत्र लिहिण्याचा प्रश्न हमखास असायचा. कधी मित्राला त्याच्या वाढदिवसानिमित्त अभिनंदन करणारं तर कधी मामाला परीक्षा झाल्यावर सुट्टीत येणार असल्याची बातमी कळविण्यासाठी. अर्थात प्रत्येक वेळी चार ओळी लिहून झाल्यावर पुढे काय लिहायचं असा यक्षप्रश्न पडे. लांबलचक पत्र कसं लिहू शकतात याबद्दल माझ्या मनात नेहमीच कुतूहल असे.... आजही आहे. पोस्टकार्डावर किती मजकूर लिहिणं शक्य आहे. परंतु पोस्टकार्डावर संपूर्ण रामरक्षा लिहिणारा माणूस आमच्या शाळेत आला होता. मध्यंतरी कुठेतरी वाचलं की पाश्चिमात्त्य देशांतल्या एका शहरात नागरिकांनी कित्येक फूट लांबीचं पत्र लिहिलं होतं आणि त्या पत्राखाली हजारो लोकांनी सह्या केल्या होत्या. लांबलचक पत्रांबद्दल अशाप्रकारच्या बऱ्याच 'चौकटी' वर्तमानपत्रात वाचल्या. परंतु अत्यंत छोटं पत्र कुणी लिहिलं असेल? ते केवढं असेल?त्याची नोंद कुणी घेतली असेल? हे प्रश्न मला दरवेळी सतावीत राहिले. मी नेहमीच त्या शोधात राहिलो-

आणि एकदा तो सुदीन अनपेक्षित उजाडला. जगात लिहिल्या गेलेल्या अत्यंत छोट्या- लघुत्तम



Marathe Pratishthan

पत्राबद्दलची अतिशय मनोरंजक माहिती अशीच एका मित्राने गप्पांच्या ओघात सांगितली.

इंग्लंडमधील एका जगप्रसिद्ध लेखकाने आपले पुस्तक एका प्रख्यात प्रकाशकाकडे प्रसिद्धीकरिता पाठविले. परंतु काही महिने लोटले तरी त्या प्रकाशकाकडून काहीही पत्र आले नाही किंवा पुस्तकही प्रसिद्ध झाले नाही. आपल्यासारख्या प्रतिथयश व श्रेष्ठ साहित्यिकाची कलाकृती इतका काळ प्रसिद्ध न होत नुसती पडून राहावी हे पाहून त्याला आश्चर्य वाटलं... आणि खेदही झाला. याला काय कारण असावं याची त्याला काहीच कल्पना येईना. म्हणून त्याने त्या प्रकाशकाला पत्र लिहिण्याचं ठरवलं. मनात शब्दांची जुळवाजुळव सुरू झाली. पत्र लिहिण्यासाठी तो टेबलापाशी गेला. परंतु विषय तसा नाजूक आणि संवेदनाशील असल्यामुळे काय लिहावं... किंवा पत्राचा आरंभ कसा करावा याबद्दल तो विचार केल्यावर मजकूर निश्चित झाला-

आणि त्याने पत्र लिहिलं व शांतपणे डोळे मिटले.

त्या कागदावर त्याने एकही शब्द लिहिला नव्हता. त्या कोऱ्या कागदावर होतं. फक्त एक ठळक प्रश्नचिन्ह. त्याला वाटलं- नव्हे खात्री होती की प्रश्नचिन्ह पाहिल्यावर प्रकाशकाला आपल्या पत्राचा अर्थ निश्चित समजेल. आपल्यासारख्या जगप्रसिद्ध लेखकाचं पुस्तक एवढ्या कालवधी-नंतरही प्रसिद्ध झालं नाही म्हणजे काय?

पत्र पाहिल्यावर त्या प्रकाशकाच्या भुवया स्वाभाविकच वर गेल्या. तोही तेवढाच हुशार होता. पत्रातल्या प्रश्नचिन्हाचा अर्थ त्याला कळला. आलेल्या पत्राचं उत्तर त्याने त्याच पद्धतीने लेखकाला पाठवलं. ते उत्तर नि:शब्द होतं. प्रकाशकाने उत्तरादाखल एका कोऱ्या कागदावर फक्त भलं मोठं उद्‌गारचिन्ह काढलं होतं. ज्या उद्‌गारचिन्हात लेखकाच्या प्रश्नाचं सविस्तर उत्तर सामावलेलं होतं. त्याचा अर्थ असा होता की आपल्यासारख्या श्रेष्ठ लेखकाचं पुस्तक प्रसिद्ध होऊ शकलं नाही म्हणजे काहीतरी अपरिहार्य अडचणी असणार! एरवी आपल्या मनात अशी शंका आली तरी कशी?

आपल्या पत्राला प्रकाशकाने पाठविलेले समर्पक आणि तेवढंच औचित्यपूर्ण उत्तर पाहिल्यावर लेखकही खूश झाला. त्याने मनापासून दाद दिली. शब्दांच्या पलीकडली ती भाषा त्या दोघांनाही समजली होती.

**- ना. ज. जाईल (पृ.७५५)**
१२, साधनासदन, नौपाडा, हायवे सोसायटी,
एस.व्ही. रोड, ठाणे (प.) ४००६०२
फोन :०२२-२५४०६७१६
मोबाईल:९८६९०१६७१६

## वाचकांचा पत्रव्यवहार

दर तीन महिन्यांनी आपले हितगुज हे मुखपत्र प्रसिद्ध होते. हे मुखपत्र चांगल्या दर्जाचे आहे यात काहीच शंका नाही. हे अधिक चांगले व्हावे व मराठे कुटुंबीयांची माहिती अधिक प्रमाणात यावी म्हणून काही सूचना करण्यासाठी हा पत्र प्रपंच. या सूचनांविषयी पुणे कार्यकारिणीत चर्चा झाली आहे व या सूचना मान्य आहेत.

हितगुजमध्ये कार्यक्रमाची छायाचित्रे जास्त प्रमाणात येणे आवश्यक आहे. डिसेंबर २०११ मध्ये पुणे येथे मराठे परिवाराचे कुलसंमेलन झाले. या संमेलनची भरपूर छायाचित्रे असती तर अंक आकर्षक झाला असता. या संमेलनात ख्यातनाम लेखक ह. मो. मराठे यांचे कथाकथन, साधनाताई मराठे यांचे नर्मदा परिक्रमाचे अनुभव सर्वांना भावले. यांची छायाचित्रे आवश्यक होती. श्री. प्रशांत मराठे यांचेही छायाचित्र देऊन त्यांचा परिचय चौकटीत दिला असता तर त्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले असते. खरं म्हणजे पाच लाखाचे पारितोषिक मराठे परिवारात यापूर्वी कोणाला मिळाले असेल असे मलातरी वाटत नाही. इतक्या मोठ्या रकमेचे पारितोषिक केंद्रीय सरकारकडून मिळवणारे श्री. प्रशांत मराठे यांचा परिचय व कर्तृत्व यावर अधिक प्रकाशझोत टाकणे आवश्यक होते. प्रतिष्ठानला जागा देऊ केलेल्या श्रीमती लीला मराठे यांचे छायाचित्र देणे योग्यच ठरले असते. असे म्हणतात की, एका छायाचित्र जितकी पटकन माहिती देऊ शकते तितकी माहिती किंवा त्या प्रसंगाचे वर्णन २५ ओळी लिहिल्या तरी देता येत नाही.

हल्ली सर्वत्र रंगीत छायाचित्रेच काढली जात असल्यामुळे रंगीत छायाचित्रेच छापणे योग्य ठरेल व त्यामुळे हितगुज आकर्षक व कलरफुल दिसेल. आपल्या हितगुजचे मुखपृष्ठ व शेवटचे पानच फक्त रंगीत छापले जात असल्यामुळे मुखपृष्ठावरील संपादकीय आतील बाजूस घेऊन मुखपृष्ठावर रंगीत छायाचित्रे छापता येतील.

आपल्या वेबसाईटसंबंधी ही आम्ही चर्चा केली. वेबसाईट अपडेट होणे. हे आताच्या संगणकाच्या युगात आवश्यक आहे. निरनिराळ्या कार्यक्रमाची छायाचित्रे वेब साईटवर भरपूर प्रमाणात त्वरित देणे आवश्यक आहे. आपण जर वेबसाईट वर सहज नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की कार्यकारिणीच्या सभासदांपैकी काही जणांचीच छायाचित्रे दिली आहेत. व बाकीच्या चौकटी मोकळ्या आहेत. अनेक वेळा सांगूनही अध्यक्षांचे छायाचित्र अजूनही राहिलेले आहे.ध

आपल्या वेबसाईटवर चार पाच ई मेल उपलब्ध असून त्याचा उपयोग केले जात नाही. हितगुज संपादकांसाठी hitguj@marathepratishthan.org यासारखे ई-मेल, अध्यक्ष, सेक्रेटरी यांनाही वापरता येईल.

आपण याविषयी संपादकांशी व कार्यकारिणीतील सभासदांशी बोलून त्यांची मते जाणून घ्यावीत. व योग्य त्या सुधारणा कराव्यात ही विनंती.

**-माधव मराठे, पुणे**

(हे पत्र दिनांक १५ सप्टेंबरच्या सभेत सौ. नीलांबरीताईंनी वाचून दाखवले. त्यावर अध्यक्षांनी आणि संपादिकेने स्पष्टीकरण दिले. वेबसाईटविषयी सी. गो. खांबेटे यांनी स्पष्टीकरण दिले.)



Marathe Pratishthan

# गोमांतक मराठे परिवारातर्फे 'कोजागिरी पौर्णिमा' उत्सव साजरा

**- श्री. प्रदीप अनंत मराठे**

गोव्यामध्ये कुळण साखळी येथे नवीनच स्थापन झालेल्या श्री देवी योगेश्वरीच्या मंदिरात गोमंतक मराठे परिवारातर्फे कोजागिरी पौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात व थाटात साजरा करण्यात आला. या निमित्त सकाळी लघुरुद्र जप व स्वाहाकार अनुष्ठान आयोजित करण्यात आले होते. सकाळी साडेआठ वाजता सुरू झालेल्या या अनुष्ठानात आठ आमंत्रित ब्राह्मण तसेच इतर मराठे सभासदांनी भाग घेतला. या अनुष्ठानाचे यजमानपद सौ. व श्री. अरुण रमाकांत मराठे, हंसापूर, पेडणे यांनी केले. अनुष्ठान संपल्यावर दुपारी एक वाजता पूर्णाहुती, आरती तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. दुपारच्या महाप्रसादासाठी अंदाजे १०० मराठे कुलबांधव/भगिनी उपस्थित होते.

दुपारच्या विश्रांतीनंतर संध्याकाळी ५.३० वाजता श्री. अरुण मराठे व साथी कलाकारांचा भक्तीगीत, भावगीत, नाट्यगीत यांचा 'सूर वरद संध्या' हा सुमधुर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने रसिक बांधव उपस्थित होते.

रात्रौ ठीक आठ वाजता कोजागिरी पौर्णिमेनिमित्त देवी योगेश्वरीच्या पालखी (शिबिकोत्सव) उत्सवास प्रारंभ झाला. पालखी परिक्रमेत अनेक मराठे कुलबांवांनी अभंग तसेच मंगलाष्टके देवीच्या चरणी अर्पण केली. मंदिराभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर देवीची पालखी मंदिरात परत आली व त्यानंतर महाआरती, सामूहिक गाऱ्हाणे व तीर्थप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. या पालखी उत्सवाचे यजमानपद सौ. व श्री. प्रदीप अनंत मराठे, वेळगे, डिचोली यांनी स्वीकारले. या सोहळ्यास जवळ जवळ ३०० मराठे परिवार सभासद तसेच इतर चित्पावन ब्राह्मण उपस्थित होते.

तद्नंतर रात्रौ ९.३० वाजता सर्व उपस्थितांनी अल्पोपहारामध्ये इडली-सांबार, शिरा व मसाले दुधाचा आस्वाद घेतला.

अल्पोपहारानंतर खऱ्या अर्थाने कोजागिरी उत्सवास प्रारंभ झाला.यानंतर रात्र जागविण्यासाठी मराठे परिवाराने लहान मुलांसाठी भक्तीगीत, नाट्यगीत, भावगीत स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा दोन गटांमध्ये (वयोगट १० वर्षांखाली व वयोगट १० ते १५ वर्षे) घेण्यात आली.

या स्पर्धेत बहुसंख्य मराठे आणि चित्पावन मुलांनी भाग घेतला. छोट्या गटात चि. अवधूत मराठे व मोठ्या गटात कु. प्रचिती गोगटे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

या कार्यक्रमाची सांगता श्री. प्रसाद गाडगीळ यांनी नारायणा रमारमणा आणि भैरवी गाऊन केली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. आनंद म्हसकर व श्री. सूरज सहकारी यांनी परीक्षण केले तर हार्मोनियमवर श्री. प्रसाद गाडगीळ, तबल्यावर श्री. भाऊ बर्वे आणि श्री. विद्याधर तुळपुळे यांनी साथ केली.

या कार्यक्रमात अनेक लहान मुलांनी भाग घेऊन आम्ही काही कमी नसल्याचे दाखवून दिले व भारतीय संस्कृती आम्हा छोट्यांच्या हातात सुरक्षित असल्याची जाणीव करून दिली.

या पूर्ण दिवसाच्या भोजन तसेच अल्पोपहाराची जबाबदारी श्री. दीपक प्रभाकर मराठे (श्री मराठे केटरर्स, डिचोली) यांनी पार पाडली. त्याचप्रमाणे परिवार अध्यक्ष श्री. कृष्णा काशिनाथ मराठे, कार्यवाह श्री. प्रदीप अनंत मराठे, देवस्थानचे पुजारी श्री. सुहास दत्तात्रय मराठे, श्री. अरुण रमाकांत मराठे, श्री. वसंत विष्णू मराठे, सौ. प्राजक्ता प्रदीप मराठे, श्री. अरूण व सौ. अपूर्वा अरुण मराठे व इतर मराठे परिवार सभासदांनी विशेष परिश्रम घेऊन हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी केला.

रात्रौ १.३० वाजता संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली आणि पुन्हा पुढील वर्षी याहून विशेष थाटात हा कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प करून सर्वांनी निरोप घेतला.

योगेश्वरी मंदीर स्थापन झाल्यापासून गेली तीन वर्षे असा कार्यक्रम करण्याचा गोमांतक मराठे परिवाराचा मानस होता त्याला यावर्षी यश मिळाले व हा कोजागिरीचा उत्सव मराठे परिवाराने आयोजित करून आपल्या एकीचा प्रत्यय आणून दिला

- शब्दांकन : श्री. प्रदीप अनंत मराठे
कार्यवाह, गोमांतक मराठे परिवार समिती, गोवा
फोन : ९४२०६८७२२०

## वाचकांचा पत्रव्यवहार

सप्टेंबरचा अंक वाचला; फारच आवडला हितगुजमध्ये नवनवीन सदरे यावीत त्यामुळे मराठे परिवाराला. निश्चितच मार्गदर्शन मिळेल. उदाहरणार्थ : १. वधु-वर स्थळांची नोंदणी २. नोकरीच्या संधी ३. थोरामोठ्यांच्या मुलाखती ४. मराठे परिवारातील उद्योजकांची माहिती ५. निरनिराळ्या भागातील देवदेवतांची माहिती.

गुलाबाचे फूल, नाते औषधांशी, आई आणि साठीच्या दिवसाचा आनंद, कविता (श्रावण महिन्याचे वर्णन) आवडले. अधिक मासाविषयी अधिक समजले. मराठे परिवारास शुभेच्छा!

**- श्री. गोविंद ना. मराठे** (पृ. ५४०)
डॉमिनक प्लाझा, २ रामा--, तिस्क उसगाव, फोंडा रोड गोवा, फोन : ९६६५८५५७४७



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची. जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शनिवार दिनांक १५ सप्टेंबर २०१२ ला मराठे प्रतिष्ठानची सर्वसाधारण सभा सकाळी ११ वाजता लक्ष्मीकेशव हॉल, ठाणे येथे भरली. आय-व्ययावर चर्चा झाली. हितगुजचे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव मराठे (पृ.५२०) यांनी आपले मनोगत मांडले. त्यांच्या नातीने शैक्षणिक कर्ज घेतले होत त्यात भर घालून ते प्रतिष्ठानला परत केले. ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज घेतले आहे ते त्यांनी परत केले की नाही हे पाहावे, त्याचा पाठपुरावा करावा, शिक्षण झाले, नोकरी मिळाली की प्रतिष्ठानला ते विसरतात असे होता कामा नये. आपण शिक्षण घेऊन प्रगती केली तशी संधी इतरही गरीब, गरजू व होतकरू कुलबांधवांना मिळत राहावी व मराठे. परिवाराची अधिकाधिक उन्नती व्हावी यरा उदात्त हेतूने कर्जफेड वेळेवर करावी असे आवाहन श्री. लक्ष्मणराव यांनी केले.

अध्यक्षस्थानी शिवसेनेचे पहिले महापौर, श्री साईबाबांचे परम भक्त, भगवद्गीतेची महती, गीतेची थोरवी सांगणारे ग्रंथ लेखक, टेलिफोनच डिरेक्टरी लिहिण्याचे कष्टाचे पण महत्त्वाचे, मोठे कार्य करणारे श्री. वसंतराव मराठे होते. मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांनी त्यांचा शाल, श्रीफळ आणि चांदीच्या भेटवस्तू देऊन सत्कार केला. वसंतरावांच्या सौभाग्यवतींचा सत्कार हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधाा प्र. मराठे यांनी केला. श्री. वसंतरावाचे उद्‌बोधक भाषण झाले. त्यापूर्वी त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून देण्या आला. उज्ज्वल गिरीश जाखोटिया, वरदा अभिजीत काणे, प्रमोद मराठे यांची सुकन्या, या विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषके देण्यात आली.

श्री. विनय मराठे, श्री. अभिजीत फडणीस, श्री. आप्पा खांबेटे, सौ. अनघा विवेक मराठे, श्री. संतोष जोशी इत्यादींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ. मंजिरी गिरीश जाखोटिया, श्री. आप्पा खांबेटे, सी. गो. खांबेटे, सौ. नीलांबरी मराठे, श्री. रमाकांत विद्वांस यांनी आपली मनोगते व्यक्त केली. पोहणारे वीर श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांचाही सत्कार केला. त्यांनी आणलेल्या मिठाईचा खाऊ वाटण्यात आला. या प्रसंगी प्रतिष्ठानला देणग्याही मिळाल्या. स्वादिष्ट, रुचकर जेवणाने सभा संपली. कुलबांधवांच्या भेटीचा अनुभव सगळ्यांनाच मिळाला.

मराठे प्रतिष्ठानची बैठक शुक्रवार दिनांक २६ ऑक्टोबर २०१२ ला श्री. रमाकांत विद्वांस, माटुंगा यांच्या घरी झाली. सभेला श्री. मोहन मराठे, वि. के. मराठे, वा. ग. मराठे, हेमंत मराठे, प्रभाकर मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, सी. गो. खांबेटे, रमाकांत विद्वांस हे उपस्थित होते.

कार्यवाहांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. हितगुजचा छपाई व वितरण खर्च पुढे परवडणार नाही म्हणून पोस्टाने हितगुज अंक पाठविला तर कमी पैसे लागतील याविषयी चर्चा झाली. शंभरावा अंक हितगुजचा कसा निघेल म्हणून चिंता व्यक्त करण्यात आली. एवढ्या कमी वर्गणीला हितगुज अंक छापून कुलबांधवांना पाठविणे कठीण होणार आहे. महागाई वाढली, कागदाचे दर वाढले तेव्हा वर्गणी वाढविणे आवश्यक असल्याचे सर्वानुमते ठरले. उपाध्यक्ष त्यासंबंधी आवाहन लिहून देणार असे ठरले.

चहापान, फराळ होऊन सभा संपली.

## सहवेदना

प्रसिद्ध लेखक, आपले कुलबांधव श्री. प्रभाकर सी. मराठे यांच्या धर्मपत्नी कै. सौ. सुनीता यांचे दिनांक २३ ऑगस्ट २०१२ला दु:खद निधन झाले.

कै. सौ. सुनीता यांनी मुलांना शिक्षण देऊन मोठे करून त्यांचा संसार थाटून, नातवंडांच्या बाललीलांचा आनंद अनुभवीत उत्तम गृहस्थाश्रम केला. कार्यशील ४० वर्षे व पुढे श्रीकृष्णकृपेने लाभलेल्या आदर्श वानप्रस्थाश्रमाची स्वास्थ्य व समाधानाची १४ वर्षे (एकूण ५४ वर्षे) परमार्थात रमलेले लेखक श्री. प्र. सी. मराठे यांना संसार प्रवासात उत्तम साथ त्यांनी दिली. कृष्णाज्ञा घेऊन मोक्ष प्रगतीपथावरच्या पुढील प्रवासस्थानी त्यांनी आपला देह ठेवला . अहेवपणी मरणाचे भाग्य त्यांना मिळाले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुनीता प्रभाकर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!


**श्री गणपती अथर्वशीर्ष भावार्थ**

**मराठीत अनुष्टुपात भाषांतरासहित**

: लेखक :

श्री. प्र. सी. मराठे

*

: प्रकाशक :

केशव भिकाजी ढवळे

*

किंमत : रु.१५/-

पत्ता : श्री. प्रभाकर सी. मराठे

४०२, सनफ्लॉवर, ठक्कर पार्क, वाकोला, सांताक्रूझ (पू) मुंबई ४०००५५ फोन : ०२२-२६६७२२०५

मोबाईल : ९६१९८९६४३५


Marathe Pratishthan

# धाकटी जाऊ

**सौ. दीपिका हेमंत मराठे, बडोदे (पृ. ४८०)**

ती. स्व. सदाशिव बळवंत मराठे व कै. अ. सौ सुधा सदाशिव मराठे यांच्या आम्ही तीन स्नुषा. मी, मधली दिप्ती राजेंद्र व धाकटी अंजली आशुतोष. आम्ही दोघी मी व दीप्ती राजस्थानात हिंदी-इंग्रजी माध्यमातून स्नात झालो, त्यामुळे मराठी भाषा व साहित्य ह्याचा संबंध आमचा लग्नानंतर बडोद्यास आल्यावरच आला. परंतु आमची धाकटी जाऊ अंजली हीचा जन्म, शिक्षण, नोकरी व महाराष्ट्रीय साहित्ये, संगीत, नाट्य वगैरेशी निकटचे नाते झाले. शिवाय त्यात तिची आवड तिने जोपासली. म्हणून तिचे कौतुक.

सौ. अंजलीचे शिक्षण बी.कॉम., सी.सी.--पर्यंत तिने खूप निष्ठेने करता करताच मराठी वाङ्‌मयाचा अभ्यास व त्या अनुषंगाने 'चारोळी' सारखी लघुकाव्ये, निंबध, लेख असे लिखाण चालू असते. गुजरात मध्ये प्रसिद्ध होणारी हिंदी, मराठी, इंग्रजीतून लिखाण चालू असल्याने ते तिला प्रोत्साहनवर्धकच ठरते. शिवाय प्रथम पंजाब नॅशनल बँक व मग सध्या इंडियन ऑईल कंपनी --सिनियर ऑफिस सुप्रिंटेन्डन्ट म्हणून कार्यशील आहे. कंपनीच्या वारंवार निघणाऱ्या मासिकांतून व सेमिनार कार्यक्रमातून तिला तिचा छंद-निवेदिका म्हणून पण जोपासायला मिळाला आहे.

गेल्या चार-पाच वर्षापासून बडोद्यातील महाराष्ट्रीय मंडळांचे कार्यक्रम बव्हंशी तिच्या निवेदनाशिवाय झाले नाहीत. निवेदन किंवा सूत्र संचालन म्हटले की तिथे अंजली मराठे असणारच असो असे परिमाण झाले आहे. फक्त महाराष्ट्रीयनच नाही हिंदी संगीताच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याचा ठीक अनुभव मिळवला आहे. बडोद्याच्या कार्यक्रमाकरता महाराष्ट्रातून आलेल्या कलाकारांशीही तिने खूप चांगले संबंध ठेवले आहेत. उदा.सौ. मंगला खाडिलकर, कमलेश भडकमकर, प्रविण दवणे, सुधीर गाडगीळ, भाऊ मराठे व धनश्री लेले. त्यांच्या सारख्यांना आदर्श समोर ठेवून ती तिची कला वृद्धिंगत करत राहते. शिवाय बडोद्यातील सर्व मराठी संस्थामधून प्रत्यक्ष काम करून वाङ्‌मयाची सेवा आपली नोकरी व संसार सांभाळून करीत असते. मागील वर्षी वाङ्‌मय परिषद बडोदे येथे अध्यक्ष आलेले श्री. यशवंत देव ह्यांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंजलीने केले होते. श्री. देवांनी तिची पाठ थोपटली होती.

मात्र बडोद्यातच नाही तर गुजरातमधील अन्य शहरातही जिथे जिथे मराठी मंडळे आहेत तिथे ती सूत्रसंचालक व निवेदिका म्हणून जात असते. गुजरातमध्ये आजपर्यंत राजकोट, भावनगर, अहमदाबाद, सेलवास, सुरत अशा अनेक ठिकाणी तिने तिची कला प्रदर्शित केली आहे. आतापर्यंत बडोदे व गुजरातमध्ये ३०-३५ जाहीर कार्यक्रमातून तिची जबाबदारी पार पाडली आहे. ह्या उपक्रमात सातत्याने तिच्या क्षेत्रातील ज्येष्ठांच्या सहवासातून नवीन नवीन गोष्टी ग्रहण करीत असते.

आमच्या कुटुंबात ती सर्वांचीच लाडकी झाली आहे. कारण नोकरी व संसार सांभाळून तिने जी आवड जोपासली आहे त्याचे कौतुक आम्ही नाही करायचे का? म्हणूनच अट्टाहासाने घाबरत घाबरत मराठी लिखाणाची हिंमत केली आहे. हिंमतीला दाद मिळेल अशी अपेक्षा ठेवू का?

**- दीपिका हेमंत मराठे**
**(पृ. क्र. ३८०)** C/o. स.ब. मराठे,
'अन्नपूर्णा' शास्त्रीलेन, मराठे वाडा,
कोठीचार रस्ता, बडोदे,
फोन : २४२८६१८

## आवाहन : श्री भावई देवी जीर्णोद्धार

पेंडसे, नातू, करंदीकर, सिधये, मराठे या पाच घराण्यांची श्रद्धास्थान म्हणून कोचरे येथील भावई देवीला मान दिला जातो. गेली चार ते पाच वर्षे दर वर्षी देवीच्या पूजेला जाण्याचा योग आला. त्यावेळी असे जाणवले की, आपण पूजा करत असलेल्या देवीची मूर्ती पूजा अभिषेकामुळे फार झिजलेली आहे. चौकशी करता असे कळले की, सदरची मूर्ती अंदाजे पाचशे ते सहाशे वर्षांपूर्वीची आहे. आशा झिजलेल्या मूर्तीची पूजाशास्त्र संमत नाही, त्यामुळे मनात मूर्तीच्या जीर्णोद्धाराचा विचार जोर धरू लागला.

पुण्यात या विषयी पेंडसे, करंदीकर, सिधये या कुटुंबीयांचे बरोबर चर्चा केली असता असे ठरले की आपण पाचही घराण्यांनी मिळून जीर्णोद्धाराचे कार्य केले तर त्याला मूर्त स्वरूप येईल.

तरी कोचरे मूळ गाव असणाऱ्या करंदीरकर, पेंडसे, नातू, सिधये मराठे ह्यांनी खालील व्यक्तींशी त्वरित संपर्क साधावा.

आपले नम्र,

१. पेंडसे अनिल, मोबाईल : ९८२२६५८१७८, Email : anil-mandolin@yahoo.com
२. करंदीकर किशोर, मोबाईल : ९४२२०८५५९०, Email : kskarandikar@vsnl.com
३. सिद्धये विश्वास, मोबाईल : ९८२३३८८४०५, Email : visddhaye@hotmail.com

**- प्रेषक : सौ. नीलांबरी रमेश मराठे, पुणे (पृ.क्र.२८०)**



Marathe Pratishthan

# चिंतन

-**चित्रकार राजा मराठे** (पृ.२५८)

सौ. अनघाच्या आईस,

अगदी अलीकडेच भाऊंच्या भेटीच्य निमित्तानं 'काव्य सरिता' या काव्य संग्रहाची प्रत हाती आली अन् आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर उघडले गेले. माझ्या उद्यममधील वास्तव्यात मला तुमची ओळख व घरचा परिचय आहेच. परंतु या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने ते अधिक दृढ झाले. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात कुटुंब संस्थेच्या भिंती कोसळत असताना एक सधन कुटुंबातील मुलगी आपल्या घरच्या मंडळींची, सासूसासऱ्यांची सावली होण्यात प्रथम कर्तव्य मानते हे माझ्या दृष्टीने कुतूहलाचा विषय आहे. कुटुंबाचा प्रचंड व्याप, सर्वांशी असलेले घरोब्याचे संबंध, त्यांची उठबस, मित्र परिवार, मुलांचं संगोपन, त्याचं शाळा कॉलेजचं शिक्षण, पुढे लग्नकार्य, नातवंडं अशा विस्तारित जाणाऱ्या कुटुंबाच्या परिघाचा केंद्रबिंदू म्हणून हसत हसत मुखाने कार्यरत राहणे ही सामान्य गोष्ट नव्हे. त्यांची बारशी, वाढदिवस,लग्नकार्य, लग्नाचे वाढदिवस, साठी शांत या मध्ये सक्रिय भाग घेऊन त्यांना शुभेच्छेचे प्रतिक म्हणून काव्य सुमनांची जी निर्मिती झाली ती शारदेच्या कृपेविना अशक्य होती.

प्रसंगानुरूप लहान-सहान काव्य निर्मिती करणारे अनेक आहेत; परंतु आपल्या समाजातील चाललेल्या अंधानुकरणावर तुम्ही शब्दांची मर्यादा सांभाळून जे भाष्य केले आहे त्यातच या काव्यसंग्रहाचे मोठेपण सामावालेलं आहे. आजच्या लहान मुलांना संस्कार हा शब्द फक्त पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित राहिलेला आहे. इंग्रजी माध्यमातून शिकणारी आपली मुलं अता मम्मी, डॅडी म्हणण्यात धन्यता मानतात. तेवढ्या दीपाचं औक्षण करणाऱ्या आईला मेणबत्तीच्या आरासामध्ये हॅप्पी बर्थ डे करण्यता धन्यता वाटते. सायंकाळ झाली की घरात शुभंकरोती म्हणण्याचा अनेक कुटुंबात प्रघात आहे. आता त्याची जागा टी.व्ही.वरील कार्टून्सनं घेतली आहे. वाढदिवस म्हणून साजऱ्या होणाऱ्या धाबडधिंग्यासाठी सर्वांनी जमायचं, केक कापायचा, कानठळ्या बसणारं संगीत लावून आरडाओरड अचरट नृत्य करायची, प्रेझेंट, रिटर्न गिफ्टचा सोपस्कार आटोपला की घरी परतायचं, असा एक कोरडा व्यवहार अनेक कुटुंबामध्ये रूढ होऊ पाहत आहे.

चहूबाजूला टोलेजंग इमारती आकार घेत आहेत. परंत आजपावेतो घर म्हणून जोपासलेल्या संस्कृतीच्या भिंती धडाधड कोसळत आहेत. कित्येक कुटुंबातील आजी-आजोबांची घरची परिस्थिती उत्तम असूनसुद्धा त्यांना वृद्धाश्रमाची वाट धरावी लागत आहे. मुलगा अथवा मुलगी म्हणून आयुष्यातभर ज्यांची दुधावरची साय म्हणून जपणूक केली तिची मुलं आपल्या मुद्दाम वागण्याने संघर्ष निर्माण करून वृद्धांना त्यांचं जीवन असह्य करीत आहेत. आज नाहीतर उद्या येणाऱ्या काळासमोर सर्वांनाच याचा जाब द्यावा लागणार आहे.

पूर्वीच्या काळी दिवाळीचा सण मोठ्या दिमाखानं साजरा होत असे. भल्या पहाटे उटणं लावून अंघोळी आटोपल्यावर लक्ष्मीपूजनाचा सोहळा होत असे. सर्व कुटुंबीय घरी फराळाला एकत्र बसत. भाऊबीजेच्या दिवशी भाऊ बहिणीकडे ओवाळणीसाठी आवर्जून येत असे. आता घरच्या फराळाचा चाट मारून बाजारी वस्तूंनी त्यांची जागा घेतली आहे. घरोघरी होणारा चिवडा, लाडू, चकली आता कंत्राटी पद्धतीने खोक्यातून येत आहे. उंबरठ्यासमोर तेवत्या पणतीच्या प्रकाशात साकार होणारी ठिपक्यांची रांगोळी कालबाह्य ठरून त्याची जागा रेडीमेड प्लॅस्टिकचे रंगीत तुकडे घेऊ लागल्याचे दिसत आहे.

भारतीय परंपरा व शिष्टाचार जपणाऱ्या कुटुंबात आता श्रीगणेशपूजनाच्या निमित्ताने येणारं बाजारी स्वरूप धक्कादायक आहे. थर्माकोलच्या तयार मखरात प्रतिष्ठापना केलेल्या श्री गणेशाला आता कॅसेटवरून घडणाऱ्या शब्दोच्चारांना सामोरं जावं लागत आहे. दुर्वा-बेल-पत्री जाऊन त्यांची जागा आता धातूंच्या पत्र्यांनी घेतली आहे. घरगुती प्रसादाची हकालपट्टी होऊन त्यांची जागा आता बाजारी मोदकांनी घेतली आहे. घरच्या आरतीपेक्षा महाआरतीचं वेड वेगानं पसरू लागलं आहे. विसर्जनाचं आता केवळ निमित्त साधून धांगडधिंगा-अचकट अंगविक्षेप करून 'वडापाव'कडे सारं लक्ष गुंतलेलं आहे. या आपत्तीतून मार्ग काढणारा तो एक गणेशच आहे! हे गणेशा! माझ्या या भक्तांचं रक्षर कर! सुबुद्धी दे!

आजची नवी-जुनी पिढी आधुनिक खाद्यपदार्थांना नकळत बळी पडत आहे. वरण, भात, तूप, पोळीची जागा आता छोले-बटुरे घेत आहेत. पंचामृत-मिरची,लोणचं, कांदाभजी मागे पडून त्यांची जागा बर्गर-पिझ्झा-सॉस-जॅम हे पदार्थ घेत आहेत; परंतु एवढ्यावर थांबायला कुणीच तयार नाही. चटक-मटकला चटावलेली जीभ आईस्क्रीमचे कप फस्त करायला आसुसलेली आहे. या दुष्टचक्राच्या सापळ्यात नकळत ओढली जाणारी ही चिमुकली बालपिढी ही मोठी चिंतेची बाब आहे.

विज्ञानाची वाढ... सिलिकॉन युगाची पहाट... भुरळ घालणारे हे शब्द कसला संदेश देत आहेत. ई-मेल, पेजर, मोबाईल अगदी हाताजवळ आला आहे. परंतु पत्र लेखनाची कला कालबाह्य ठरण्याच्या सीमेवर आहे. जन्म, वाढदिवस, लग्नकार्य तसंच अनेक मंगल घटना निमित्त घडणारं चिंतन, शुभसंदेश हा दोन यंत्रामधील भावनाशून्य संवादाचा फार्स तर ठरणार नाही ना!

व्यवहाराच्या पोटचक्रात तारुण्य व प्रौढपणा यांची फरपट होत असताना आपल्यासारख्या गृहिणीनं संपर्कात आलेल्या प्रत्येकास कृतज्ञता, आधार, आदरातिथ्य, आपलेपणा अशा अनेक गुणांचं दर्शन या कविता संग्रहाच्या निमित्तानं आजच्या तरुण पिढीला घडविलं हे नक्कीच मोठं मार्गदर्शन ठरावे. येथे कुणासाठी उपदेश नाही, करावं याचा आग्रह नाही, फक्त वाचकास

Marathe Pratishthan

‘तू योग्य मार्गानं जात आहेस ना!’ असा सावधतेचा ईशारा आहे.

मला उमजलेल्या काव्यसरितेचा भावार्थ हा असा आहे. अशा प्रकारची काव्यरचना करणारी कवयत्री माझ्या वाडीतील एक असावी याचा विशेष आनंद आहे. गाता गळा, शिंपिता मळा कधीही वाया जात नाही त्याप्रमाणे लेखणी व कागदाची सोबत ठेवल्यास नवीन शब्दरचनेची निर्मिती होईल व आपल्या सर्वांच्या ते फायद्याचे ठरेल. हा संकल्प पुरा हो यासाठी परमेश्वरानं निरोगी असं आयुष्य द्यावं. व प्रोत्साहन देण्यासाठी की भाऊंच्या प्रकृतीस लवकर आराम द्यावा ही टोकेगावच्या शिवाकडे नम्र प्रार्थना!

**- चित्रकार श्री. राजा मराठे**

(पृ.२५८)
१४, उद्यम, उद्यमकुंज सोसायटी, राणीसती मार्ग,
मालाड (पूर्व), मुंबई ४०००९७,
फोन : ०२२-२८७७८६३९

## श्रद्धांजली : आमची थोरली वहिनी : सौ. सुधा श्रीपाद मराठे

आमची सर्वांत मोठी वहिनी सौ. सुधा श्रीपाद मराठे मूळ पाळी, ता. डिचोली, गोवा सध्या वास्तव्य होते टिळकवाडी, बेळगाव (कर्नाटक) यांचे दिनांक ७-९-२०१२ शुक्रवार रोजी संध्याकाळी पाच वाजता दु:खद देहावसान धाकटी मुलगी सौ. वंदना प्रकाशराव कुलकर्णी, कोल्हापूर (महाराष्ट्र) हिच्या निवासस्थानी झाले. त्यांचे वयमान सत्तर होते. नुकत्याच दोन महिन्यापूर्वी त्या पणजी झाल्या होत्या. आमचे थोरले बंधू श्री. श्रीपाद आम्ही त्यांना दादा म्हणतो ते ब्याऐंशी वर्षांचे आहेत. दादांना दोन सुविद्य कन्या - मोठी श्री. सदाशिवराव परांजपे, गारगोटी (कोल्हापूर) यांचेकडे लिी असून तिचे नाव जयश्री तीही आजी झाली आहे. सौ. वहिनींचे माहेर विजयनगर (हिंडलगा) कर्नाटक (बेळगाव) येथे आहे. गेली पन्नास वर्षे वहिनींनी दादांचा हसतमुखाने, परोपकारी वृत्तीने, जिद्दीने, चिकाटीपणाने संसारवृक्ष सांभाळला. त्या वेळी काही अत्यानंदाचे तर काही वेळा शंकराचे ही क्षण डोकावून गेले. दादांची पंच्याहत्तरावी अत्यंत धुमधडाक्यात साजरी झाली. त्यावेळी आम्ही तीन भाऊ व त्यांचे कुटुंबीय आवर्जून हजर होतो. पुष्पहाराव्यतिरिक्त त्यांनी काहीही स्वीकारण्यास नकार देऊन आम्हालाच उपकारात ठेवून परतफेड केली. यात वहिनींचा सिंहाचा वाटा होता. त्यांना नोकरीच्या अनेक संधी आल्या; पण पती आणि संसारावर लक्ष केंद्रित केले. आम्हा भावंडांना बहिणींना त्यांनाच सांभाळून घेतले. कधी राग रूसवा. दुजाभाव केला नाही. दादा पोस्ट ऑफिसमध्ये होते. त्यांच्या तुटपुंज्या वेतनात भाकरीही गोड मानून घेतली तेही कठीण दिवस गेले व आता सुखासमाधानाचा लहरी आल्या असत्या अचानक त्या आमच्यातून निघून गेल्या. अशी पाखरे येतील आणिक जातील पण त्यांच्या सुखद स्मृती अनंतकाळपर्यंत राहतील. आमच्या मराठे घराण्यातील चालू पिढीतील एकमेव त्या पणजी होत्या; अंतकाळी धाकट्या सौ. वंदनाने धीरोदत्तपणे सहनशक्ती एकवटली. निश्चितच वहिनीचे तिच्यावर अनंत आशीर्वाद आहेत. आमचे दादा शतायुषी होवोत. उत्तम आयुष्य, आरोग्य लाभो व आम्हा भावंडांना त्यांचे सतत मार्गदर्शन लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. कै. वहिनींना सर्व भावंडे, नात्यागोत्यातील माणसांची भावपूर्ण श्रद्धांजली. परमेश्वर त्यांना शांती देवो.

**- श्री. गोविंद ना. मराठे, (पृ.५४०)**

डॉमनिक प्लाझा. दुसरा रामा, तिस्क उसगाव, फोंडा रोड, गोवा. फोन : ९६६५८५५७४७

## वाचकांचा पत्रव्यवहार

पत्रास मुद्दाम कारण की जून २०१२ चा हितगुजचा अंक पाहिला, वाचला आणि खूप आनंद झाला. इतर लेखसुद्धा चांगलेच आहेत; पण गांधर्व महाविद्यालयाच्या कृतज्ञता समारोहच्या लेखाला तुम्ही इतकी सुंदर प्रसिद्धी दिली आहे. त्यामुळे मला अनेकांचे फोन आले. लेखाचे कौतुक झाले. पण मी सर्वांना हेच सांगितले, की ह्याचे श्रेय हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधाताईंकडे जाते.

हितगुजमुळे मराठे परिवारातील चांगली कामे करणारे, चांगले यश मिळवणारे अशा गुणी मराठे मंडळींची सर्वांना ओळख होते. आमच्या घरी हितगुज सर्वजण मनापासून वाचतात.

जून महिन्यातच श्री. दिलीप गोसावी यांची प्रमोद मराठे यांच्या घरी गाठ पडली तेव्हा ते म्हणाले, ‘‘अहो ताई, लेख वाचून मला अगदी गहिवरून आले.’’ मी म्हटले, ‘‘तुम्हाला कसा लेख वाचायला मिळाला?’’ तेव्हा त्यांनी मला त्यांच्या जवळचा हितगुजचा अंक दाखवला. मला खूप आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला.

तर असे हे हितगुजचे काम सदैव बहरत राहो, हीच सदिच्छा!

**- सौ. वर्षा गोडबोले (पृ.१२९)**

संचालिका, सरगम संगीत विद्यालय, रघुनंदन,४५, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८ दूरध्वनी : ०२०-२५४३९७६४ मोबाईल : ९८२२७५४६४०



Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

माझी Endoscopy व Colouoscopy

मला तीन मुली. माझ्या मोठ्या मुलीचे लग्न १९९६ साली झाले व दुसऱ्या मुलीचे २००४ जूनमध्ये झाले. २००५ दसऱ्याला माझ्या तिसऱ्या मुलीने प्रेमविवाहाचे आमच्या कानावर टाकले ११ डिसेंबर २००५ला तिसऱ्या मुलीची एंगेजमेंट व १५ डिसेंबराला २००५ला दुसरी मुलगी बाळंतीण झाली. २००६ एप्रिलमधे तिसऱ्या मुलीचे वैदिक पद्धतीने लग्न थाटामाटात केले. २००४ ते २००६ ह्या काळात बरीच धावपळ झाली. आर्थिक ओढाताण झाली व कळत नकळत माझ्या तब्येतीवर परिणाम झाला. माझ्या आईची प्रकृती वातुळ व माझी प्रकृतीपण वातुळ म्हणजे चण्याची डाळ वर्ज्य. वाताचा प्रकार उर्ध्व विकार म्हणजे अपानवायू म्हणजे खालून सरकणारा नाही तर वर चढणारा त्यामुळे वायू वर चढला की, श्वास तकलाफ.

मी सुरुवातीस जे माझ्या दोन मुलींच्या लगनचे, बाळंतपणाचे लिहिले त्यामागे तब्येतीवर परिणाम कसा होतो हे सांगावयाचे होते. आमच्या फॅमिली डॉक्टरकडे वेळोवेळी तपासणी करायचो, पण आमच्या घरात जन्मापासून आयुर्वेद त्यामुळे ह्या गॅससाठी ओवा, भास्करलवणचूर्ण, पोटाला बाम लावणे, सकाळी गरम पाणी पिणे, जेवणात वातुळ पदार्थ कमी खाणे असे वागून गॅस द्यायचो नाही अथवा मोकळा करायचो.

२००७ जुलैमधे गॅस वर चढणे कमी होईना व श्वासपण घेता येईना त्यावेळेस आमच्या एम.डबी.डॉक्टरला तब्येत दाखवली त्यांनी गोळ्या लिहून दिल्या त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मग त्यांनी स्टूल तपासवयास सांगितले व त्यात ब्लड जातेय असा रिपोर्ट आल्यावर. लिव्हर व आतड्याच्या स्पेशालिस्टकडे पाठविले त्याने पहिल्यांदा Endoscopy म्हणजे घशातून दुर्बीण टाकून पोटांपर्यंत फोटो घेतले त्यात काही निघाले नाही मग दोन दिवसांनी कोलानोस्कॉपीसाठी टेबलावर घेतले व गुदद्वारे थेट बेंबीपर्यंत कॅमेराने फोटो घेतले हे सर्व म्हणजे Endoscopy व Colouoscopy माझ्या बायकोने, जावयाने, मुलीने ऑपरेशन थिएटरमध्ये डॉक्टरसोबत उभे राहून पाहिले. मी तर दोन्ही वेळेस गर्भगळीत झालो होतो. शेवटी निदान इनर पाईल्स झाले व माझ्या जेवणावर निर्बंध आले. म्हणजे रेषायुक्त आहार, तिखट, तेलकट नाही असे पथ्य सुरू झाले व त्या माझ्या ५९व्या वयाला योग्यच होते. फक्त निदान होईपर्यंत जिवाची माझी व माझ्या पत्नीची घालमेल कोणत्याही शब्दात सांगता येणार नाही.

सप्टेंबरचा अंक वेळेवर माझ्या हाती पडला. वाचून समाधान वाटले व मी काविळीने २८ऑगस्टपासून आजारी पडलो व अजूनही घरीच आराम करीत आहे. आज २४-९-२०१२ रोजी पत्र लिहिण्यास बसलो व २००७ सालची माझी Endoscopy व Colouoscopy हा अनुभव लिहिला आहे योग्य वाटल्यास छापावा.

- **श्री. मोहन मराठे, बडोदे** (पृ.४२१) फोन - ०२६५-२४३८०७७

## वाचकांचा पत्रव्यवहार

माहे सप्टेंबर २०१२चा 'हितगुज' मिळाला. ---- खूप आनंद झाला. प्रत्येक अंकामध्ये बरेच काही वेगळे व वर्णनपर आणि अनुभवांनी भरलेला अंक वाचून समाधान होते. छान वाटते.

१. सर्वांत --खूप अनुभवांनी भरलेला लेख श्री. यशवंत मराठेंचा - सायकल प्रवास. लेख वाचून खूपच कौतुक वाटले. वयाच्या ७० नंतर सायकल प्रवास तो सुद्धा एवढा खडतर आश्चर्यच आहे. त्यांना मी फोन करणारच आहे. त्यांनी एवढे दाखवले की प्रश्न वयाचा नसून जिद्दीचा, उत्साहाचा व चैतन्याचा आहे. धन्य ते विंग कमांडर मराठे. त्यांना पुन्हा एकदा सॅल्यूट.

२. नाते औषधाचे - वि.म. ठरावीक वयानंतर माणूस किती औषधाचा खंबीर मित्र असतो ते जागृत उदाहरण. सकाळपासून रात्रीपर्यंत व नंतर अखेरपर्यंत एकच मित्र औषध. माणसाची एक शोकांतिका आहे. कविता खूपच भावली. संग्रहित ठेवली.

३. शिक्षक ते वकील सौ. पेंडसे यांचा लेख- एक निस्पृह व्यक्तिमत्त्व. वडील या नात्याने संस्कारक्षम, प्रेमळ, शिक्षणाचे महत्त्व जाणणारे व त्याप्रमाणे वागणारे सर. लेख वाचल्यानंतर खूपच गहिवरून आलं. एकूण सर्व हितगुज अंक छान. अनुभवांनी काठोकाठ भरलेला व आपले त्यामध्ये व्यक्तिमत्त्वाचे गुण आहेतच. पुन्हा एकदा धन्यवाद!

- **श्री. भा. द. मराठे,** 'मोरया', प्लॉट ३७, सह्याद्री नगर, मिरज.

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपण हितगुजचे संपादन अगदी तटस्थपणे करता. त्यात कधीही आपली टिमकी वाजवण्याचा प्रकार अजिबात नसतो. त्यामुळे प्रत्येक अंक वाचनीय होत आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन

- **अ. द. मराठे (पृ.२७०)** ६ मंजूषा, विकास हाऊसिंग सोसायटी, शास्त्रीनगर, डोबिंवली (प.) ४२१ २०२,
फोन : ०२५१-२४९९८४२ मोबाईल : ९८५०२४१९१३



Marathe Pratishthan

# AMACHI MUMBAI

- Shyamala Purandare (Jail-marathe) (page 755)

*There are beautiful hills in Mumbai*
*Malabar hill is, of course far the rich rich;*
*Nargis, Ushakiran, Gulzar, Aamir Khan, Ranbir and Dilipkumar*
*Palihill is the favourite of Shinde Sushilkumar*

*Cloud 9, 7 roads, 5 gardens, 3 Batt and 1 Khada Parsi*
*Ushaben Mehta, Nana Sunkersett and Chudasama gems of Mumbai*
*Bengal Chemicals, Vasai's Fort withArnala's Baburar*
*Lata-Asha's Pedar road is a landmark with filmcity of Gorgaon*

*Parle Tilak, Bal Mohan, Dhirubhai Ambani, Avabai Petit and*
*Bombay Scottish School*
*But I like my Indian Education Society's New English School'*
*Cross, Azad, Wankhede, MCA and Dy Patil Stedium*
*Where all sportspersons spend quality time maximum*

*The railway is the main artery and blood vessel*
*Everysecond thousands of  commuters travel*
*Eachone is in a mad rush absolutely*
*Mumbai is working nonstop tirelessly*

*Dabbewala has the perfect management*
*Prince Charles praises him as the Best*
*The Gateway of India, The Taj and manymore are the spots of joy*
*Which everbody loves to visit and enjoy*

*Paral is full of hospitalsreputed*
*All patients struggle to get admitted*
*The heart of the city is Dadar Park Shivaji*
*Well Known residence of Veer Savarkar, Pethes and Phadke Babuji*

*Arabian Sea makes financial capital full of humidity*
*But every Mumbaikar wants to breathe with humanity*
*Whether hut or skyscraper, the stay has to be always comfy*
*So every Indian want Aamahci Mumbai Clean and Greeny!*

**- Shyamla Purandare (पृ.७५५),**
27 B, Vrindavan Society, Panchavati, Pashan, Pune 411 008
Mobile : 9403625724 Phone : 020-25898534

## मानसन्मान

चि. सिद्धार्थ अभय जाईल (पृ.७५३) हा या वर्षी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला असून त्याला ८८% गुण मिळाले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. सिद्धार्थचे हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा!

## मानसन्मान

चि. अथर्व विजय मराठे, पुणे याला माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ५५० पैकी ४५२ म्हणजे ८२.१८टक्के गुण मिळवून ते उत्तीर्ण झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अथर्वचे हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा!

(श्री. विजय विष्णू मराठे हे पुणे मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणीचे कृतीशील सभासद आहेत. त्यांचा अथर्व हा मुलगा आहे.)

## नांदा सौख्यभरे

चि. सौ. कां. भक्ती (सौ. हेमा व श्री. विठ्ठल यशवंत मराठे यांची द्वितीय कन्या) हिचा शुभविवाह चि. जवाहर सदानंद प्रभुखानोलकर यांजबरोबर शुक्रवार दिनांक २९-६-२०१२ ला दुपारी १२ वाजून ३४ मिनिटांनी सिटी हॉल, बेळगाव येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना अनेक शुभेच्छा, शुभाशिर्वाद


## नांदा सौख्यभरे

चि. प्रणव (सौ. संगीता व श्री. शाम यशवंत मराठे, बेळगाव यांचे ज्येष्ठ सुपुत्र) यांचा शुभविवाह चि. सौ. कां. भावना श्रीपाद गोडबोले, धारवाड हीजबरोबर शनिवार दिनांक ७-७-२०१२ ला सकाळी ९ वाजून ३९ मिनिटांनी धारवाड येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा वधुवरांना शुभाशीर्वाद आणि अनेक शुभेच्छा!

Marathe Pratishthan

## नीरज हेमंत मराठेने (पृ.३८०) सीमेन्स स्टुडंट ॲवॉर्ड पटकावले.



दिनांक १४-९-२०१२ रोजी जर्मनीतील प्रतिष्ठित कंपनीच्या सीमेन्स स्टुडंट ॲवॉर्ड-२०१२ च्या अंतिम स्पर्धा नुकत्याच बर्लिन येथे झाल्या. जर्मनीमधून चारशे विद्यार्थ्यांची या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यातून तीस विद्यार्थ्यांना निवडले. त्यानंतर अंतिम कक्षेत ह्या दहा जणांना सभागृहात मंचावर बोलविण्यात आले. व सीमेन्स कंपनीच्या डायरेक्टर व वरिष्ठ अधिकारी यांच्यासमोर विद्यार्थ्यांना लिहिलेल्या विषयावरच्या लेखावर फक्त एक ते दीड मिनिटात त्यांचे विचार मांडावयास सांगितले. त्यात तीन विद्यार्थी यशस्वी झाले. प्रथम व दुसरा क्रमांकावर जर्मन विद्यार्थी आणि तिसऱ्या क्रमांकावर बडोद्याचा नीरज मराठे यशस्वी झाला. नीरजने स्पर्धेत इंग्रजी भाषेतून भाग घेतला होता. नीरज मराठे सध्या जर्मनीत मेकॅनिकल इंजिनिअरच्या मास्टर डिग्रीचा अभ्यास करीत आहे. बडोद्याच्या महाराज सयाजीराव विश्वविद्यालयातून बी.ई. (मेकॅनिकल)मध्ये डिस्टिंक्शन घेऊन पास झाला आहे. तिसऱ्या क्रमांकाचा सत्कार म्हणून त्यास सीमेन्स कंपनीकडून सीमेन्स स्टुडंट ॲवॉर्ड २०१२, ट्रॉफी, सर्टिफिकेट आणि पाच हजार युरोचा चेक अपर्ण करण्यात आला. मंचावर उपस्थित मान्यवर व सभागृहात उपस्थित अनेक प्रेक्षकांनी त्याचे बरोबर हस्तांदोलन करून सन्मान केला. चि. नीरज मराठे ह्याच्या लेखाचा विषय होता ''Photo-Volcanic Power-Cold Storage for Agricultural Products'' मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. नीरज हेमंत मराठे याचे हार्दिक अभिनंदन!

- प्रेषक : सदाशिव बळवंत मराठे, बडोदे

### सहवेदना

दिनांक ८ नोव्हेंबर २०१२ रोजी ज्येष्ठ विद्युत परीक्षक विष्णू तथा अरविंद रामचंद्र मराठे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. विद्युत परीक्षक म्हणून त्यांनी गेली ४० वर्षे काम केले होते. १९६५ व १९७१ च्या युद्धात नागरी संरक्षण दलातर्फे त्यांनी सहभाग घेतला होता त्याबद्दल त्यांना राष्ट्रपतीपदकही मिळवले होते. पुणे सार्वजनिक सभेमध्ये ते कोषाध्यक्ष म्हणून शेवटपर्यंत काम करत होते. आर्य संगीत प्रसारक मंडळ (सवाई गंधर्व महोत्सव) या संस्थेमध्ये ते गेली ५९ वर्षे कार्यरत होते. तसेच भारतीय जनसंघामध्ये कै. रामभाऊ म्हाळगी यांच्याबरोबर त्यांनी काम केले होते. भारतीय जनता पार्टीमध्ये ते सल्लागार म्हणून काम करत होते. तशाच अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले आहे. पुण्यातील मराठे प्रतिष्ठानच्या वार्षिक समारंभात त्यांची कायम उपस्थिती होती. आपल्या पुणे शाखेच्या सभांमध्ये वेळोवेळी त्यांनी सल्लागार म्हणूनही काम बघितले होते. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. विष्णू तथा अरविंद रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

### सहवेदना



दिनांक १ नोव्हेंबर २०१२ रोजी ज्येष्ठ पशुवैद्य डॉक्टर चिंतामणी रामचंद्र मराठे (वय ७२) यांचे अकस्मात निधन झाले. पशुवैद्यक म्हणून त्यांनी गेली ३५ वर्षे काम केले होते. बायफ आणि बृहन्स लॅबोरेटरी या संस्थांमध्ये त्यांनी काम केले होते. तसेच बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेटशी ते निगडीत होते. निवृत्तीनंतर त्यांनी कोथरूडच्या गीता धर्ममंडळाच्या संचालक मंडळावर काम केले. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले आहे. पुण्यातील मराठे प्रतिष्ठानच्या मासिक सभेसाठी त्यांनी आपली जागाही दिली होती. आपल्या पुणे शाखेच्या सभांमध्ये वेळोवेळी त्यांनी सल्लागार म्हणूनही काम बघितले होते. त्यांच्यामागे दोन मुली आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. चिंतामणी रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



### 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

**पाव पान रु. ६००/-** **अर्धे पान रु. १,२००/-** **पूर्ण पान रु. २,५००/-**

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

## चकित करणारा अवचित गड



अवचितगड रोहे तालुक्यातील एक छोटेखानी किल्ला. रोह्यास मावशीचे घर असल्यामुळे दरवर्षी मे महिन्याच्या सुट्टीत जाणे-येणे असे. किल्ल्याचे नावदेखील कानावर पडत असे. पण किल्ल्यावर जाणे काही जमले नाही. हा योग जुळून आला तब्बल २०-२५वर्षांनंतर Rock Climbers Club मुंबई!!!

मुंबईपासून रोहे शहर हे तीन-चार तासाच्या अंतरावर आहे. नागोठणेमार्गे भिसे खिंडीतून खाली आल्यावर मेढा हे गाव लागते. त्या गावातून किल्ल्यावर जाण्यास वाट आहे. ह्या व्यतिरिक्त पिगालसाई आणि पेंडसे या गावातूनदेखील वाटा आहेत.

अशा ह्या अवचितगडावर जायची तारीख ठरली ३ सप्टेंबर २०१२. Rock Climbers Club बरोबर मी प्रीतम हॉटेल, दादर येथून पूर्ण तयारीनिशी आम्ही अवचितगडाकडे कूच केले. मेढा गावात पोहोचेपर्यंत सूर्य डोक्यावर आला होता. आम्ही तशाच परिस्थितीमध्ये किल्ल्यावर चढाईस सुरुवात केली. मेढा गाव संपल्यावर दोन विहिरी लागतात. विहिरीतील पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब छान चमकत होते. पावसाचे दूरपर्यंत नाव नव्हते. त्यामुळे विहिरीतील पाण्याचे दर्शन घेऊन दुधाची तहान ताकावर भागवली. किल्ल्याकडे जाणारी वाट ही गर्द झाडीतली असल्यामुळे उन्हाचा त्रास तितकासा होत नव्हता.

साधारणत: दोन तासात आम्ही किल्ल्यावर प्रवेश केला. किल्ला तसा लहान असल्यामुळे पूर्ण किल्ला पादाक्रांत करण्यास तास दीड तास पुरेसा होतो. किल्ल्यावर बघण्यासारखी महत्त्वाची ठिकाणे म्हणजे पनवेलच्या दुर्गामित्रांनी १५०फूट दरीतून वर काढलेली तोफ, पिंगलसाई देवीची घुमटी, महादेवाचे आणि म्हसोबाचे मंदिर, युद्धशिल्प, छोटासा तलाव. ह्याव्यतिरिक्त पेंडसे गावाकडे जाणारा साकव (लाकडी पूल) आपले लक्ष वेधून घेतो. वातावरण जर उत्तम असेल तर सुधागड, सरसगड, तैल बैल, कोरीगड, घनगड आणि दुर्गराज रायगडच्या दर्शनाचा लाभ आपण घेऊ शकतो. रोहे शहर आणि कोकण रेल्वे यांचे विलोभनीय दृश्य किल्ले अवचितगडावरून दिसते.

अवचितगडाची इतिहासात तशी नोंद घेतलेली दिसत नाही. ह्या किल्लाची शिलाहार राजवटीत जडण-घडण झाली असे इतिहासतज्ज्ञ मानतात. किल्ल्याचे काम फार त्वरित झाले म्हणून याचे नाव अवचितगड पडले. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत या गडाचा उपयोग कुंडलिका नदी आणि तिच्या खाडीवर लक्ष ठेवण्यासाठी होत असून १८१८मध्ये हा किल्ला ब्रिटिशांनी पेशव्यांकडून जिंकून घेतला. (विकिपिडीयावरून साभार)

किल्ला बघताना वेळेचे भान राहिले नव्हते. दुपारचा प्रहर टळून गेला होता. किल्ला उतरताना पोटात कावळे ओरडू लागले होते. मेढा गावातील ओक काकांकडे जेवणाची सोय Rock Climbers Club ने केली होती. त्यांच्याकडील विहिरीवर थंड पाण्याने अंघोळ केली आणि साग्रसंगीत जेवणाचा आस्वाद घेतला. बरोबर अवचितगडाची आठवण तोंडी लावणाऱ्या लोणच्यासारखी साथ देत होती.

ह्या अनुभवाच्या वेळी सोने पे सुहागा म्हणजे संपादक प्रसाद पोद्दार (सामना, फुलोरा) हेही आमच्याबरोबर होते. Rock Climbers Club चे जीवा-शिवा (उत्कर्ष आणि दिलीप) ह्यांचेही मार्गदर्शन आम्हाला लाभले. मेढा गावातून निघेपर्यंत संध्याकाळ झाली होती. आणि दोन ओळी मनात गुणगुणत मुंबईकडे प्रयाण केले, 'Rock Climbers Groupने असेच ऑर्गनाईझ करावेत ट्रेक्स, त्या निमित्ताने होईल आमची किल्ल्यांशी भेट.' अधिक माहितीकरिता संपर्क साधा : Utkarsh Erandkar : 9869215547, 993060990

-श्री. **निरंजन प्रभाकर मराठे**, (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०००३१, फोन नं. : ९८२०७३४८८४

## हितगुज राखीव फंड निधी

श्री. मधुसूदन खांबेटे, ठाणे, प्रीता करमरकर (भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव मराठे यांची नात), श्री. गिरीश जाखोटिया, पार्ले, श्री. अ. द. मराठे, डोंबिवली, श्री. विठ्ठल यशवंत मराठे, बेळगाव, चार्टर्ड अकौंटंट श्री. श्रीकांत मराठे, बोरीवली, श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई, श्री. आशुतोष दिवाकर विद्वांस, विरार, सौ. केतकी किशोर पेंडसे, नालासोपारा, श्री. चिंतामणी मराठे, कळवा, श्री. वा.ग. मराठे, सौ. वृषाली वामन मराठे, पुणे.

कै. विनय खांबेटे स्मृतीद्वारा शिक्षणासाठी म्हणून कु. प्रीता करमरकर हिने १०,०००रु. कर्ज म्हणून परतफेडीच्या अटीवर घेतले होते ते तिने शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी लागल्यावर न विसरता मराठे प्रतिष्ठानला परत केले. याशिवाय ५०००रु. मराठे प्रतिष्ठानला दिली. खरोखर प्रीताचे हार्दिक अभिनंदन. परिवारातील ज्या व्यक्तींनी शिक्षणासाठी कर्ज घेतले आहे त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर, आर्थिक दिवस चांगले आल्यावर त्यांनी ते पैसे प्रतिष्ठानला न विसरता परत करावेत म्हणजे आपल्याच परिवारातील गरजू विद्यार्थ्यांना अधिकाधिक मदत करता येईल. प्रीता करमरकर हिचे अनुकरण अवश्य करावे. शिक्षणासाठी कर्जाऊ घेतलेली रक्कम तिने परत करून त्यात स्वत:ची भर घालून तिने एक चांगला आदर्श ठेवला आहे. या सर्व कुलबांधव-भगिनींचे हार्दिक आभार!

विशेष सूचना : 'हितगुज' राखीव फंड निधी-देणगी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी.



Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

गणेशोत्सवानिमित्त सर्वांना उत्तम आरोग्य, समृद्धी लाभो. आपल्या राज्याची तसेच भारताची नैसर्गिक आपत्तीतून सुटका होवो, ही गणेशचरणी प्रार्थना.

'हितगुज' सप्टेंबर २०१२ ह देखणा व सर्व रसगुणसंपन्न अंक मिळाला. सप्टेंबर पहिल्या आठवड्यात घरपोच पुनःश्च धन्यवाद!

कविता, निवडक पुस्तके, काव्यसंग्रह रसग्रहण, आध्यात्मिक चिंतनपर लेख-सोप्याभाषेत, विविध प्रकारचे अन्य लेख नाविन्यपूर्ण तसेच वाचनीय व चिंतनीय आहेत.

वार्षिक अहवाल, ठळक घटना, मानसन्मान, सहवेदना नेहमीच्या रिवाजाप्रमाणे* उत्तम

आवडलेल्या लेखांविषयी थोडक्यात :

* अधिकमासानिमित्त थोडी अधिक माहिती- गायत्री खांबेटे जोशी- लक्षणीय

* अच्युत चक्रदेवांचा बंदी लेख चक्रावून टाकणारा इतक्या गुणी तिंबूनानांवर बंदीची कुऱ्हाड का?

* शिक्षक ते वकील ॲड. दिवाकर विद्वांस यांचे विषयीचा त्यांची कन्या केतकी पेंडसेचा लेख आदर्श पित्याच्या आदर्श लेखीचा सहजोद्गार व सच्चेपणा दर्शविणारा भावला.

* विंग कमांडर (नि.) यशवंत मराठे यांचा प्रेरणादायी लेख भ्रमणध्वनी छापल्यामुळे प्रत्यक्ष लेखकाला अभिनंदन व धन्यवाद देण्यास उपयोगी पडला. तरी संपादिकेचे विशेष आभार.

* पर्सनल लाईक स्केच-२ फारच सुंदर पुन्हा वाचून लेखकाला मराठीत पत्र लिहावेसे वाटते.

सज्जन माणूस आयुष्याची कमाई असलेले अनेक कुलबांधव समाजात निश्चितच मानमान्यता मिळवत आहेत. आम्हा माहेरवाशिणींना त्याचा सार्थ अभिमान व आनंद आहे.

* कविता : गुलाबाचे फूल सुंदर. वास्तवाचे भान ठेवून रचना

* नाते औषधांशी : वि.म.मराठे - बिगर साखरेची चहाची तल्लफ शुगरफ्री ने आणण्याची गंमत मजा आणते सोबत डायबेटिसना सजा देते.

* आईची साठी (श्रावणसरी) कविता. अनुक्रमे प्रत्यक्ष सणाचे नाव न लिहिता समर्पक वर्णन श्रावणसरी नाव शोभले असते.

* महेश मराठे : आई- बोनस आयुष्यात आता सावली बनून राहते घरभर - हृदयस्पर्शी. प्रेमात अखंड बुडून निःशब्द होते क्षणभर सुंदर यमक, समर्पक

* 'नैवेद्य' रसग्रहण वाचून प्रत्यक्ष पुस्तक नव्हे पुस्तके घेण्याची इच्छा होते आहे. प्रतिभा मराठे यांचे प्रत्यक्ष भेटून कौतुक करावेसे वाटते. असो.

१५-९-२०१२ ठाणे येथील सभासमारंभात प्रत्यक्ष भेटल्याचा आनंद अनोखा होता. अध्यक्ष आनंदराव व त्यांचे समस्त सहकारी अभिनंदनास, धन्यवादास पात्र आहेत. या कारणाने मा.वि.गो.ची प्रत्यक्ष भेट झाली. सभेतील सर्व सूचना अंमलात येणे अशक्य. तरी माझ्या शक्ती, बुद्धीला अनुसरून सहकार्य करता आल्यास आनंदच वाटेल. संपादकीय मजकूर अभ्यासपूर्ण. निर्भिडपणे सद्यपरिस्थितीचा परामर्श घेऊन प्रत्येकाने विचार, जागृती, व कृती त्रिसूचीच अंमलबजावणीची वेळ सावधपणे व तळमळीने केली आहे. क्षणभर स्वा. सावरकरांच्या भाषणाचे स्मरण व्हावे असे आहे. लवकरात लवकर 'हितगुज' राखीव फंड निधीमध्ये फूल ना फुलाची पाकळी द्यायची आहेच. ही संकल्पना जरा स्पष्ट झाल्यास बरे. गैरसमज नसावा.

- कुमद डोके (निवृत्त कलाशिक्षिका),

अ-२ १०५/१०६, 'गिरीजा', नीलकंठ हाईटस, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.) ४००४०६ फोन :०२२-२५८८१६५५

### सहवेदना

श्री. प्रभाकर जनार्दन जाईल, पुणे यांचे दिनांक ३ ऑगस्ट २०१२ ला दुःखद निधन झाले. त्यांचे चिरंजीव श्री. अभिजित आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मराठे परिवार सहभागी आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. प्रभाकर जनार्दन जाईल यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

स्वातंत्र्यसैनिक कै. अच्युत रामचंद्र बेहरे यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन

- सौ. वृषाली वामन मराठे, वा. ग. मराठे (पृ.५०३), पुष्कराज मराठे, चि. तेजश्री पुष्कराज मराठे आणि परिवार

**पेरावे ते उगवते। बोलिल्यासारखे उत्तर येते। तरी मग कर्कश्य काय बोलावे?**



Marathe Pratishthan

**बक्षीसपात्र निबंध**
**(कै. श्री. चिंतामणी बळवंत मराठे व्यक्तिचित्रण स्पर्धा)**

# गुरूभक्ती

- सौ. वर्षा गोडबोले (पृ.१२९)

खरे नाव मधुसूदन असणाऱ्या पं. लालजी गोखल्यांना लहानपणी चित्रपट सृष्टीतील पहिले 'कृष्ण' होण्याचा मान मिळाला होता. घरचे वातावरण नाट्य-चित्रपट सृष्टीचे होते. पण पंडितजींचे मन तिथे रमले नाही. त्यांचा ओढा संगीताकडे होता आणि मन विशेषतः तबल्यावर जडले होते. उस्ताद अहमदजान थिरकवाँ साहेबांचे गंडाबंध शिष्य म्हणून ते नावारूपाला आले. अनेक मोठ्या कलाकारांबरोबर साथसंगत करण्याचे भाग त्यांना मिळाले. विद्यादानाचे पवित्र कार्य करून अनेक तबला वादक त्यांनी घडवले. अनेक मानसन्मान, पुरस्कार त्यांना मिळाले.

त्यांची गुरूवर अतिशय निष्ठा होती, भक्ती होती. गुरुंचे पण ते लाडके पट्टशिष्य होते. कारण लालजींचे वादन म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य होते. साथसंगतीचा त्यांचा ठेका आदर्श मानला जाई.

खाँसाहेब अहमद थिरकवाँ साहेबांच्या मृत्यूनंतर त्यांची कबर लखनौमध्ये बांधली गेली.

एके दिवशी पहाटे लालजींना अशी जाणीव झाली की खाँसाहेब स्वप्नात येऊन त्यांना काही त्रास होतो आहे असे सांगत होते. जाग आल्यानंतर लालजी फार अस्वस्थ झाले आणि ते लखनौला गेले. तिथे कबरस्थानात जाऊन पाहतात तर खाँसाहेबांची कबर पायाकडे उखडली गेली होती. मग लालजींनी तिथे थांबून ती उत्तमरितीने बांधून घेतली तेव्हा त्यांच्या मनाला शांती मिळाली.

खाँसाहेबांच्या दोन अविवाहित मुलींना दर महिन्याला काही रक्कम मिळेल अशी व्यवस्था लालजींनी केली होती.

अशी 'गुरूभक्ती' पाहायला मिळणं सध्या कठीण आहे.

- सौ. वर्षा गोडबोले
संचालिका, सरगम संगीत विद्यालय
रघुनंदन,४५ मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन : ०२०-२५४३९७६४ मोबाईल : ९८२२७५४६४०

## साभार पोच

### माझा जगप्रवास

लेखक : श्री. मोहन सदाशिव मराठे
प्रकाशक : श्री. सी. गो. खांबेटे * किंमत : २००/-
पत्ता : ५, रामभुवन, अहिंसा मार्ग, खार (प.) मुंबई ४०० ०५२,
फोन : ०२२-२६४६४३५१ मोबाईल : ९८१९९६४७६५



Marathe Pratishthan

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्
बिल्डर ॲंड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan